# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

डिसेंबर २०२५











फिल्ड स्टाफला
उत्कृष्ठ
एल.एस.ओ.
यासाठी सन्मानित
करण्यात आले.





















# अनुक्रमणिका


* संपादकीय – ***वृषाली मगदूम***
* आदिवासी स्त्रियांचा विकास सत्य की स्वप्न? – ***उषाकिरण आत्राम***
* चर्चेतला जैन समाज – ***डॉ. अजित मगदूम***
* नेहरूंचा शोध घेताना – ***सविता दामले***
* कविता – ***आप्पा ठाकूर***
  १. सांजवात / २. समाधी / ३. बापू
* अत्र तत्र सर्वत्र... मुसलमान! – ***तमन्ना इनामदार***
* पितृसत्ताक कुटुंब आणि स्त्री – ***अमृता आपटे***
* आरक्षण : वास्तव आणि गैरसमज – ***मधुकर वारभुवन***
* डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचा विचार – ***आशा गायकवाड***
* कस्तुरबा गांधी एक समर्पित जीवन – ***वृषाली मगदूम***
* महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद
* सिंहावलोकन आणि पुढील दिशा – ***डॉ. मेधा पुरव सामंत***
* अन्नपूर्णा त्रैमासिक अहवाल – ***अंजली पाटील***



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **वृषाली मगदूम**
- **अरविंद पाटकर**
- **अंजली पाटील**
- **प्रसाद मोकाशी**
- **प्राची बापट**



**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९, ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


## संपादकीय

– ***वृषाली मगदूम***

संवाद त्रैमासिक आपल्या हातात देताना मनात एक वेगळा उत्साह आहे, अन्नपूर्णा परिवाराच्या शिरपेचात अनेक मानाचे तुरे खोवले गेले आहेत, स्त्री चळवळीला पन्नास वर्षे होत आहेत, महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की जिथे आज जगभरात स्त्री चळवळीने काय कमावले, काय गमावले याचा लेखाजोगा मांडत आहे, गेले वर्षभर महाराष्ट्रातील सर्व शहरी ग्रामीण भागातील कार्यकर्ते अभूतपूर्व उत्साहाने एकवटले आहेत, ओसंडून वाहणारी ऊर्जा सर्वांच्यात आहे, एक विचार पेरला जात आहे, १९७५ सालची स्त्रियांची स्थिती व आजची स्थिती आपण खूप मोठा पल्ला गाठला आहे, अनेक सकारात्मक गोष्टी झाल्या आहेत, तरीही स्त्री चळवळींना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे, कार्यकर्त्यांची वानवा आहे, व्यक्तिवाद वाढला आहे, आजूबाजूचा समाज धार्मिक, जातीय, उजव्या विचारांचा, हिंसात्मक व टोकाची कृत्यं करताना दिसत आहे, हे वर्तन अनाकलनीय व अविश्वसनीय आहे. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी आशेचा दीप लावला आहे, स्वायत्त स्त्री चळवळ संघटित केलेल्या १९७५ सालापासूनच्या महाराष्ट्रातल्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेची स्थापना केली. त्यानिमित्ताने महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेतर्फे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून गेले वर्षभर कार्यक्रम सुरू आहेत. सेफ्टी ऑडिट, मनुस्मृती नको संविधान हवे, यासारख्या जनजागृती मोहिमा सुरू आहेत. ३६ जिल्ह्यांमधून सार्वजनिक सुरक्षिततेची पाहणी झाली आहे. दहा पुस्तिका काढण्यात आल्या आहेत, विभागीय कार्यक्रम चालू आहेत, महिला साहित्य संमेलन, पारलिंगी समुदायाचे अधिवेशन, पुणे, मुंबई व इतर जिल्ह्यातून एक दिवसीय परिषद असा कार्यक्रमाचा धडाका चालू आहे, परिषदेत परत एकदा कार्यकर्त्यांची मोट बांधली जात आहे. २०, २१, २२ डिसेंबरला मुंबई येथे वर्षभरातील कार्यक्रमाची सांगता होणार आहे, परिसंवाद, गटचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम असं स्वरूप असणार आहे, २२ डिसेंबरला समता व समानतेच्या रॅलीने परिषदेची सांगता होईल. महाराष्ट्राच्या विविध भागातून ५००० कार्यकर्ते अपेक्षित आहेत, या मोहिमेत स्त्रियांसह सर्व धर्मातील ओबीसी, दलित, आदिवासी, भटके विमुक्त जनजाती, अल्पसंख्याक, पारलिंगी, अपंग व्यक्ती असे सर्व या आंदोलनात एकत्र आले आहेत, अन्नपूर्णा परिवार या परिषदेचा एक भाग आहे याचा आम्हाला मनस्वी आनंद होत आहे, अन्नपूर्णा परिवाराने

गेल्या ३० वर्षात बँकांचे दरवाजे ज्यांच्यासाठी बंद आहेत अशा गरीब व गरजू महिलांसाठी सक्षम आर्थिक मॉडेल बनवून मुंबई, पुणेमधील हजारो महिलांना आर्थिक सुरक्षितता दिली आहे, त्या आर्थिक मॉडेलवर अन्नपूर्णा परिवार एक छोटी पुस्तिका काढत आहेत. ही पुस्तिका महाराष्ट्रातून येणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे, बचत गटातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवले जाणारे आर्थिक धोरण या विषयावरील गट चर्चा अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक डॉक्टर मेधा सामंत पुरव आयोजित करणार आहेत, महाराष्ट्रातील विविध भागातून मोठ्या संख्येने येणाऱ्या महिलांची राहण्याची जेवणाची व्यवस्था करताना होणाऱ्या आर्थिक खर्चाचा भार, खारीचा वाटा अन्नपूर्णा परिवारातर्फे उचलला जाणार आहे, महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेतील अन्नपूर्णा परिवाराचा भरीव सहभाग अन्नपूर्णा परिवाराच्या मूल्यांशी, तत्त्वांशी जोडणारा आहे याचा सर्वांना अभिमान आहे, अन्नपूर्णा परिवाराचे काम एका व्यापक व्यासपीठावर जात आहे हेही प्रशंसनीय आहे.

महात्मा गांधी, नेहरू, आंबेडकर या आपल्या थोर महापुरुषांविषयी आपण संवाद त्रैमासिकातून लिहित आलो आहोत, यावर्षी आपण थोडेसे स्वरूप बदलले आहे, यांचे विचारधन तुमच्यापर्यंत पोहोचवणार आहोतच, पण भारत माझा देश आहे, आम्ही सर्व बांधव आहोत, म्हणणाऱ्या आपल्या समाजात वर्गीय व जातीय टोकाचा संघर्ष दृष्टीस पडत आहे, ज्यामुळे सामान्य माणूस संभ्रमित झाला आहे, तो संभ्रम दूर करण्यासाठी अल्पसंख्यांकांचे काही प्रश्न आपण या अंकात तुमच्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे, उषाकिरण आत्राम या अनेक वर्ष गोंदिया जिल्ह्यात कचारगड या छोट्याशा जंगलाने वेढलेल्या गावात आदिवासींच्या हक्कासाठी संघर्ष करत आहेत, आदिवासी समाजाचे मूलभूत हक्क जल, जमीन, जंगल, शेती, घर सरकार हिसकावून घेत आहे, त्यांना धर्म, संस्कृतीच्या जाळ्यात अडकवत आहे. उषाताईंनी, 'आदिवासी स्त्रियांचा विकास सत्य की स्वप्न' या लेखात आदिवासी महिलांवर होणारे अत्याचार व त्यांचे असुरक्षित भयावह जगणं मांडलं आहे. महिलांचा विकास हे फसवे मृगजळ व दिवा स्वप्न आहे असं त्यांना वाटते. 'यत्र तत्र सर्वत्र' हा तमन्ना इनामदार यांचा लेख मुस्लिम समुदाय विषयी समाजात असणाऱ्या वर्तनावर उद्वेग व उपरोध प्रतिबिंबित करतों. मुस्लिम समुदाय अल्पसंख्यांक असून ज्या परिस्थितीचा सामना? त्यांना करावा लागतो ते पाहताना मुस्लिम कार्यकर्त्यांना खूप निराश वाटणे स्वाभाविक आहे. सच्चर समितीचा अहवाल, त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जगण्याचा आकडेवारी सह उहापोह करतो, तरीही या समुदायाबद्दल गैरसमज, दंतकथा पसरवल्या जातात, याची वेदना या लेखात व्यक्त होते. डॉ. अजित मगदूम यांचा 'चर्चेतला जैन समाज' परत एकदा अल्पसंख्यांक समुदायाचे प्रश्न मांडतो. हा समाज गेले वर्षभर सतत चर्चेत राहिला आहे, राजकीय लोकांचा वरदहस्त त्यांना लाभला आहे, पण सारासार विचार करून सर्व समुदायाला सामावून घेऊन योग्य न्याय काय आहे त्याचा समाजाने निर्णय घेतला पाहिजे, आपली दृष्टी व्यापक झाली पाहिजे आणि दुराग्रही अर्थ न राहता योग्य गोष्टींचा आग्रह धरला पाहिजे हे अतिशय सौम्य व संयत भाषेत डॉ. अजित मगदूम यांनी सांगितले आहे. अमृता आपटे या सामाजिक कार्यकर्तीने 'भारतीय समाजातील पितृसत्ताक कुटुंब पद्धती' ह्या लेखातून स्त्रियांना कौटुंबिक पातळीवर कशी असमान वागणुक मिळते याचा विस्तृत आढावा अनेक दाखले देत घेतला आहे, पितृसत्ताक कुटुंब सुरू होण्यामागची मानसिकता अधोरेखित केली आहे, स्त्रियांना लावली गेलेली लेबलं व त्यातून मिळणारी असमान वागणुक स्त्रियांच्यात दुयमत्वाची भावना निर्माण करते, त्यामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य, सन्मान व स्वतंत्र संधी मिळाली तरच त्यांची प्रगती होईल असे त्यांनी उद्धृत केले आहे. सविता दामले ह्या नेहरुंची आत्मकथा व डिस्कव्हरी ऑफ इंडिया या नेहरुंच्या दोन पुस्तकांच्या अनुवादीका आहेत, नेहरुंचे कार्य व कर्तृत्व याचा त्यांच्या वर प्रभाव आहे, त्यामुळे समाजमाध्यमातून नेहरुंच्या विषयी जे खोटे पसरवले जाते त्यामुळे त्या व्यथित होतात, 'नेहरुंचा शोध घेताना' या लेखात त्यांनी नेहरूंनी देशासाठी केलेले कार्य वाचकांसमोर मांडले आहे, महात्मा गांधी यांच्या संपूर्ण वाटचालीत खंबीरपणे, ठामपणे त्यांच्याबरोबर राहिलेल्या कस्तुरबा गांधी यांच्यावरील लेख आपण या अंकात दिला आहे, बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली स्त्री मुक्ती या विषयावरील लेखही वाचनीय आहे. दलित महिलांना प्रतिष्ठेने जगता यावे यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी संघर्ष केला, महिला सक्षम झाल्या पाहिजेत हा त्यांचा ध्यास होता, स्त्रियांना समान दर्जा व समान शिक्षण मिळाले पाहिजे असे बाबासाहेब सांगत असत. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या हक्कासाठी, स्त्रियांना प्रतिष्ठा व सन्मान मिळावा म्हणून संविधानात समता, समानता व कायदेशीर हक्क याची तरतूद केली, यामुळेच स्त्रिया सुरक्षित जीवन जगत आहे.

कष्टकरी महिलांना आर्थिक स्वयंपूर्ण बनवणाऱ्या अन्नपूर्णा परिवाराची गोष्ट आम्ही स्वयंपूर्णा या पुस्तकात डॉ मेधा पुरव सामंत यांनी मांडली आहे, सामाजिक उद्योजिकतेचं हे प्रेरणादायी कार्यचरित्र आहे. अन्नपूर्णा महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सर्वोत्कृष्ट वूमन फ्रेंडली इन्स्टिट्यूट २०२५ साठी साधनचा इलाबेन भट पुरस्कार मिळाला आहे. या दोन्ही यावर्षी घडलेल्या

घटनांचा अन्नपूर्णा परिवाराला सार्थ अभिमान आहे.

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली त्याचा उत्सव ही दिमाखात झाला पण गांधी नेहरू, आंबेडकर यांच्या स्वप्नातील सामाजिक आर्थिक न्यायाची गाडी पुढे सरकली का? हा प्रश्न उरतोच, बलात्कार बाल लैंगिक शोषण, आरोग्याची वेळेवर न मिळणारी मदत अल्पसंख्यांकाचा छळ, सामाजिक आर्थिक खच्चीकरण हे सर्व प्रश्न आहेतच, एका मोठ्या समुदायाच्या शोषणाची, संघर्षाची, हतबलतेची लढाई लढताना कार्यकर्ते, प्रशासन व हतबल समाज यांच्यात वाढत जाणारे अंतर विदिर्ण करते, पण आम्हा सर्वांना विश्वास आहे आम्ही सर्व समान विचारांचा धागा घेऊन पुढे जाणार आहोत, आपल्या सर्वांनीच समन्यायी जगण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. न्यायव्यवस्था, पोलीस व सरकार यांच्याशी संघर्ष व सहकार या दोन्ही गोष्टींचा सामना करायचा आहे, स्त्रियांचे संरक्षण, पितृसत्ताक संरचना या गोष्टीचा सामना करायचा आहे, सर्वांनी एकत्र येऊन आज व्यापक संघर्ष करत देशातील फॅसीझम नष्ट करून सामाजिक सलोखा प्रस्थापित करण्यासाठी एकजूट होणं आवश्यक आहे, विविधतेत एकता असलेल्या आपण सामाजिक प्रेम, सहकार यांच्या साह्याने हिंसामुक्त जीवन जगू शकतो, भगिनी भाव सुदृढ करत मानव मुक्ती च्या दिशेने जाण्यासाठीचा आमचा प्रवास नक्कीच उर्जा देणारा असेल असा आशावाद प्रगट करत मी संवाद त्रैमासिक आपल्याला सुपूर्द करते, या अंकासाठी लेखक व कार्यकर्ते यांनी आपले लेखन दिलेच, अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक डॉ. मेधा पुरव सामंत यांचे या अंकासाठीचे मार्गदर्शन मोलाचे आहे. प्राची बापट यांनी या अंकाच्या बांधणीसाठी खूप परिश्रम घेतले आहेत, अंजली पाटील यांनी अन्नपूर्णा परिवाराचा अहवाल वेळेत सादर केला आहे, ऋचा पाटील हिने अंकाचे मुखपृष्ठ व इतर सजावट केली आहे, आपण सर्वांनी संवाद अंक वाचावा, आपल्या प्रतिक्रिया नोंदवाव्या, लोकवाड्मय प्रकाशनाने नेहमीप्रमाणे अंक वेळेत उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार.

❖❖❖

# ।। कविता ।।

## तू भरारी घेत जा...

रोज लवकर उठण, घरात तुझं नांदन
नातीगोती सांभाळून, स्वत:कडे दुर्लक्ष करणं
तुझी जिद्द, तुझी मेहनत, सारं काही विसरलीस का
स्वप्ने तुझी पूर्ण करण्या, तू भरारी घेत जा...

रॅम्पवॉक केलस म्हणून, कोणी ठरत नाही वाईट
तुझ्या त्या यशाने, आमचीच होईल कॉलर टाईट
चार लोक बोलतील म्हणून, नटनं तू थांबवलस का
सुंदरतेत भर करण्या, तू भरारी घेत जा...

मागे नाही आता मुली, ड्रायव्हर ही झाल्या
डॉक्टर कोणी पोलीस, काही मंत्री बनूनी आल्या
चार बुकं वाचली म्हणून, सगळं काही झालं का
शिक्षण तुझं पूर्ण करण्या, तू भरारी घेत जा...

**– सौ. प्रणाली अतुल पवार**
(अन्नपूर्णा परिवारातील कर्मचारी)

# आदिवासी स्त्रियांचा विकास सत्य की स्वप्न?

■ उषाकिरण आत्राम

अतिशय चांगला विषय आहे हा! खरोखरच सरकार ढोल पिटून पिटून आदिवासींवर करोडो रुपये दर वर्षाला खर्च करतो, विकासाची खर्चाची यादी हनुमानाच्या शेपटीपेक्षाही लांब आणि अंदाजपत्रकातील आकडे तर वाचता येणार नाहीत एवढे मोठ्ठे शून्यावर दहा शून्य! हे एवढे करोडो रुपये आदिवासींवर खर्च होतात, तरी आदिवासी नर्मदेच्या गोट्याप्रमाणे जसे होते तसेच का? हा पैसा खर्च करणारे हात आणि डोके कोणाचे? ते आदिवासीच्या विकासावर खर्च करतात की स्वत:चा विकास करतात, ह्यावर कुणीच संशोधन करीत नाही. खरे तर यावर विद्यार्थ्यांनी पीएच.डी. करायला हवी! तरच आदिवासींचा विकास करण्यातील मगरमच्छ कोण आहेत, जे करोडो रुपये हजम करतात आणि आदिवासीला बदनाम करतात ते आपल्यासमोर येईल.

आता आदिवासी स्त्रियांचा विकास पाहू!

आदिवासी हा या देशाचा मूळमालक, जल, जमीन जंगलाचा स्वामी! उदाहरणार्थ या धरतीचा स्वामी संबुशेक राजा कोसोडुम आणि त्याची पत्नी मुलारानी हिला धरतीची रानी म्हटलं जातं. तर धरतीवर माणूस जन्मास घालणारी पहिली आई सुकमापेरी मानली जाते आणि त्यांची प्रथम पूजा केली जाते.

या धरतीचा राजा संबु म्हणजे संयुग खंड, गोंडी भाषेत संयुग म्हणजे पाच खंडाचा भूपती, स्वामी, मालक प्रथम संबूची पत्नी मुलादायीला गोंड समाजात धर्तीची मालकीण मानलं जात असे. ८८ संबू झाले. आखरी संबूची पत्नी संबू पार्वती होती. या काळात महिलांना सन्मान मिळत होता. त्या सत्ताधीश होत्या, राज्यकर्त्या होत्या. परंतु आखरी संबू काळात आर्याचे आगमन झाले. रक्तपात, लूट, हजारो वर्षापर्यंत हे महायुद्ध सुरू होते. तेव्हापासून स्त्रियांना गुलाम केले, मातृसन्मान, मातृपूजक, मातृसत्ताक सभ्यता संपली व पुरुषप्रधान सभ्यता आली आणि आदिवासी स्त्रियांवरील अत्याचार वाढले, ते कायमचेच!

आर्य सत्तारूढ झालेत आणि त्याचा धर्म, भाषा, संस्कृती, रूढी, प्रथा यात स्त्रियांवरील अत्याचारात खूप वाढ झाली. परंतु याही परिस्थितीत आपली संस्कृती, रूढी प्रथा परंपरा व मातृपूजक, मातृसन्मान विविध आदिवासी समूहांनी कायम ठेवला. त्यामुळेच मध्य काळात शत्रूसोबत हातात नंग्या तलवारी, तिरकमान, भाले घेऊन आदिवासी विरांगना लढल्या. आपआपले राज्य, परगणे, कोटकिल्ले, भूभाग व प्रजेचे रक्षण केले. कारण त्यांच्या संस्कृतीमध्ये महिलांना पूर्ण स्वातंत्र्य होते. मानवी अधिकार समानता, न्याय, सन्मान स्त्रियांना दिला जायचा त्यामुळेच त्या राज्यकर्त्या, गणप्रमुख, भूभागप्रमुख, गणमाता, गावमाता होत्या. त्या बहादूर, बुद्धिमान आणि सशक्त होत्या, त्यांना घरात चार भिंतींत ठेवून पुरुषांची भोगदासी परावलंबी अबला कुणी म्हटलं नाही, कारण महिलाच सत्तारूढ न्यायाधीश होत्या. त्यामुळेच कोयामुरीद्वीपात हजारो राज्यकर्त्या होऊन गेल्या, प्राचीन काळात त्रिजटा, सूर्पनखा, ताडका, कलीकंकाली, समलायी, बमलायी जंगोरायताड या सारख्याच बलवान स्त्रिया झाल्या, तर मध्यकाळात राजमाता दुर्गावती, कमलावती भोपाल रानी हिरमोतीन बल्लारशाह, रानी हिराई चंद्रपूर, तिलका रानी लांजीगड, रानी सुंदरी, रानी पोहपाल, उत्कलची सौरा, झाँसीची झलकारी अशा हजारो बहादूर बुद्धिमान सशक्त रणरागिणी होऊन गेल्या. त्यांना त्यांच्या संस्कृतीने स्वातंत्र्य समता, सन्मान न्याय, अभय आणि संरक्षण दिल्यामुळेच त्यांचा बौद्धिक विकास झाला. सामाजिक, राजकीय, कानुनी विकास झाला. त्या सर्वच निर्भीड बाणेदार, लढाऊ, तत्परता आणि स्वशासन, स्वयंनिर्णय घेणाऱ्या शासिका होत्या.

वर्तमानकाळातील आदिवासी स्त्रियांचा विकास सत्य की स्वप्न?

आदिवासी स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार, शोषण, अन्याय आणि त्यांच्यापासून मानवी मूल्य आणि स्वातंत्र्य हिरावून घेतल्यामुळे त्या आज तरी भयभीत झालेल्या आहेत. कारण ८०/९०% आदिवासी हे जंगल, दरी-डोंगरात, रान शिवारात राहतात. जंगल हाच प्राण आधार, हाच सखा, हाच देव. सारे काही जंगलच. झाडं, पशुपाखरं, प्राणी, त्यांचे सगेसोयरे, आदिवासी स्त्रिया तर जंगलाला बाप भाऊ म्हणतात. काही झाडांना प्रियकर मानतात, फुले, पाने, लाकूड, साली हे जीवन उपयोगी साधन, तर जंगलात शेती करून आदिवासी लोक उपजीविका करतात. रानातले पशू प्राणी यांची पूजा करतात, तर डोंगरदरी, जलाशय यांना देव मानतात. जंगलात स्त्रिया कुठेही फिरल्या तरी त्यांना कोणतीच भीती वाटत नसे. आनंदी, उन्मुक्त जीवन त्यामुळे निसर्ग सान्निध्यात त्या भयमुक्त होत्या. परंतु अलीकडेच सरकारनी विकासाच्या नावाने पहाड, जंगल आणि आदिवासींच्या जमिनी ताब्यात घेऊन उत्खनन सुरू केले आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास गडचिरोली जिल्ह्यातील सूरजागड पहाडी, राजघाट, हसदेव जंगल पहाड. निसर्गाने भरभरून दान दिले आहे इतके निसर्गसौंदर्याने नटलेले पहाड, नद्या आणि हजारो प्रकारच्या वनौषधी महावृक्ष, पशुपक्षी आणि प्राणी आणि जंगलाला जपणारे आदिवासी! हे लाखो

जीव, आणि जीवजंतू ह्यांचा सरकारने विचार केला तर नाहीच, परंतु संविधानातल्या पाचव्या सहाव्या सूचीतील, वनहक्क संरक्षण ग्राम सभा आणि आदिवासींसाठीचे संविधानातील कायदे गुंडाळून ग्रामस्थांना अंधारात ठेवून सूरजागड पहाडी, जंगल अदानीला विकून टाकले. त्यामुळेच गावे विस्थापित झाली. इथले पुरुष कामासाठी चेन्नई, मुंबई, मद्रास अशा महानगरात पोटासाठी काम शोधायला गेले, इकडे बायका पोरे मात्र पोटासाठी वणवण भटकत राहिली. एकीकडे अदानीचे सुरक्षा गार्ड काठ्यांनी झोडपून जनावरासारखे हाकलत आहेत तर दुसरीकडे जंगलात गेले तर वनविभागाचे लोक मार देऊन हाकलत आहेत, उभे पीक जाळून, नाश करीत आहेत. तरुणांना काम देतो असे सांगून चौकीदार म्हणून दिवसभर ३०० रु. देऊन उभे ठेवतात, तर तरुण मुलींना काम देतो असे सांगून पाणी पाजणे, भांडी घासणे, कपडे धुणे, स्वयंपाक करणे अशी हलकी कामे देऊन, आमिष दाखवून शरीरशोषण करीत आहेत. ज्या आदिवासी संस्कृतीमध्ये महिलांना मातृशक्ती मानून सन्मान करतात, बलात्कार, अत्याचार करत नाहीत, वेश्याव्यवसाय करत नाहीत, शरीरशोषण नाही, आदिवासी पुरुष रानात कमी कपड्यात राहणाऱ्या स्त्रियांकडे कधी वासनांध, नीच दृष्टीने पाहत नाहीत एवढी पवित्र त्यांची संस्कृती आहे, परंतु विकासाच्या नावाने घुसलेले इतर राज्यांतील ठेकेदार व कर्मचारी, त्यांनी आदिवासी तरुणींना कामाच्या नावाखाली देहविक्रय सुरू करून आदिवासी स्त्रियांचे शोषण व अत्याचार सुरू केले, विकास नाही हा तर विनाश आहे. केवढा मोठा आघात आहे. आदिवासी स्त्रियांवरील आणि संस्कृतीवर!

दुसरीकडे नक्षलवादी ठरवून १३-१४ वर्षांची तरुण मुले ते अगदी ७० वर्षांचे म्हातारे असे किती तरी आदिवासी पुरुष नक्षलवादी खबरे, संशयित समजून पोलिसांनी कोणताही पुरावा नसताना, कोणताही नक्षलवाद्याशी संबंध नसताना धरपकड करून जेलमध्ये टाकले. १०-११ वर्षांपासून ते आदिवासी तिथेच आहेत, काहींना मारून मारून अपंग केले आहे, काही तर मार खाऊन मेले आणि काही आजही जेलमध्ये आहेत. त्यांच्या बायका-मुलांचे काय? सरकारने त्यांचा कधी मानवीय दृष्टिकोनातून विचार केला काय? त्यांच्या बायका, मुली, मुलांचे पालकत्व, स्वातंत्र्य, प्रेम हिरावून घेतले. त्यांचे कौटुंबिक सुख आणि अधिकार हिसकावून घेतले, हा त्या महिलांवरती केवढा मोठा मानसिक आघात आहे, याचा आपण विचार करणार की नाही? विदर्भातील सर्व जेलमध्ये ९०% आदिवासी नक्षलवादी, खबरे म्हणून कैदीत आहेत, त्यांच्या आया-बहिणी, बायका-मुली कशा अवस्थेत असतील ह्याचा विचार कधी तरी कुणी केला असेल का? ज्या म्हातारपणात एकुलता एक मुलगा नक्षली नसताना मारला जातो, त्या आईची अवस्था काय असेल? जिचं दूध पीतं लेकरू असताना नवऱ्याला नक्षली समजून मारून टाकलं, तिचा कोणता विकास सरकारनी केला?

आश्रमशाळेतील आदिवासी मुलींवर अत्याचार, शारीरिक शोषण करून, धाक दाखवून कुमारी माता बनवून आयुष्य बरबाद करीत आहेत. महाराष्ट्रातील एक तरी आश्रमशाळा अशी आहे का, जिथं आदिवासी मुली सुरक्षित आणि निर्भय आहेत. त्यांचा विकास होत आहे. मुळीच नाही. ही बाब तर नित्याचीच झाली, कुठे कोणावर बलात्कार होतो, कुठे कोणी आजाराने मरते, कुठे विषबाधा, कुठे विजेचा करंट लागून, कुठे नदीवर आंघोळ करताना अशी हजारो उदाहरणे आहेत. आश्रमशाळेतील मुली सुरक्षित, भयमुक्त नाहीत. हा कोणता विकास?

आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींनी मोठमोठ्या राजकीय नेत्यांनी हडपल्या, आदिवासी जमिनींवर गैरआदिवासींचे बक्षीस पत्र, दानपत्र, विक्रीपत्र होवू शकत नाही. १९६६/३६, हा कायदा असूनही, महसूलमंत्री बावनकुळे म्हणतात, 'आदिवासींच्या जमिनी भाडेतत्त्वावर घेण्याचा मार्ग मोकळा आहे' म्हणजे आदिवासींवर कोणीही आपला हक्क गाजवून, त्यांना लुटून, भिकेला लावावं, हाच सरळसरळ अर्थ निघतो. सांगा मग आता आदिवासी स्त्रिया माती खाणार की झाडपाला? हा कोणता विकास?

महिलासाठी योजना ही तशाच बिनकामाच्या! कोंबडे, डुक्कर पाळा! अशा दळभद्री योजना. अरे! द्यायचे झाले तर वनातील फळेफुले, कंद, वनऔषधी ह्यांचे कारखाने काढून द्या. आदिवासी मुलीमुले निरोगी, सशक्त, निर्भीड असतात, त्यांना सैन्य, हवाई दलात कोणत्याही अटी न ठेवता घ्या. नक्षलवादी चळवळीत जर मेजर, कमांडर इत्यादी पदांवर कोणतेही प्रशिक्षण न घेता जर ह्या मुलांना घेतले जाते तर मग तुमच्या सैन्यात का नाही?

आज आदिवासी महिलांच्या जलजमीन, जंगल, शेती घरे सरकार ताब्यात घेऊन त्यांना बेघर करीत आहेत, धर्म संस्कृतीचा फास लावून अडकवित आहे, त्यांच्यावर भाषा, संस्कृती, इतिहास व समाजजीवनावर सर्व बाजूंनी भयानक आघात होत आहेत. त्यामुळेच आदिवासी महिलांचा विकास हे एक फसवे मृगजळ आणि दिवास्वप्न आहे!

❖❖❖

*(सुप्रसिद्ध आदिवासी कवयित्री व कथा लेखिका, आदिवासी जीवन जाणिवा त्यांच्या साहित्यातून प्रभावीपणे मांडतात. गोंडी साहित्य व संस्कृतीच्या अभ्यासक म्हणून ओळखल्या जातात.)*

(E-mail : ushakiranatram54@gmail.com / atram54@gmail.com)

# चर्चेतला जैन समाज

■ **डॉ. अजित मगदूम**

आर्य भारतात येण्यापूर्वी भारतात एक उच्च संस्कृती परंपरा आणि धर्म विचार अस्तित्वात होता. ही संस्कृती मोहेंजोदडो आणि हडप्पाची सिंधू खोऱ्यातील प्रगत संस्कृती होती. काही अभ्यासक जैन धर्म हा हिंदू धर्माचा एक पंथ आहे, अशी मांडणी अलीकडेपर्यंत करत होते. पण जैन धर्म हिंदू धर्मापेक्षाही प्राचीन असल्याचे अनेक पुरावे, संदर्भ संशोधकांनी दाखवून दिल्यानंतर अशी मांडणी क्षीणवत होत गेली. एक खंडप्राय आणि जगात सर्वात मोठी लोकसंख्या (१४४ कोटी) असलेल्या विशालकाय भारतात जैन समाजाची संख्या केवळ अर्धा कोटी इतकी आहे. मात्र या जैन संस्कृतीचे संदर्भ, शीलालेख, ऐतिहासिक पुरावे, अवशेष रूपाने देशातील अनेक भागांत आजही सापडत आहेत. यावरूनही त्याचे प्राचीनत्व लक्षात येते. विश्वात सत्य, अहिंसा, शांतता, आणि सद्भावना प्रस्थापित करण्याची धर्माची भूमिका आहे.

जसे पारसी समाजाबद्दल इतर समाज अनभिज्ञ आहेत, तसेच जैन समाजाबद्दल फारशी माहिती इतर लोकांना नाही आणि असण्याचे कारणही नाही इतका तो अल्पसंख्य आहे.

महाराष्ट्रापुरतं बोलायचं झाल्यास हा जैन समाज ढोबळमानाने दोन गटांत विभागता येईल. एक आहे पुणे मुंबई शहरी भागात असणारा जैन समाज जो अतिशय धनवान आहे. हिरे-मोती, सोन्या-चांदीपासून ते कपड्यांपर्यंत उद्योग व्यवहार करणारे व्यापारी, बांधकाम व्यावसायिक, गुंतवणूकदार इत्यादींचा एक जैन समाज. या गटातील सर्व जैन हे मूळ महाराष्ट्र बाहेरचे आहेत.

दुसरा गट आहे तो महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत कमी-जास्त प्रमाणात विखुरला आहे. यात शेतकरी, मध्यमवर्गीय, नोकरदार, छोटे व्यावसायिक इत्यादींचा. यांच्या बाबतीत म्हणता येईल की, ते मूळ महाराष्ट्राच्या मातीतले आहेत. हा वर्ग कुणाच्या अध्यात मध्यात न पडता आपलं 'काम आणि आपण भले' या वृत्तीचा आहे. उपद्रव निर्माण करणाऱ्या बाबींपासून सावध असणारा राजकीय, सामाजिक विचारांबाबत ठोस किंवा उग्र भूमिका नसणारा असा मवाळ आणि संयत समाज.

हाताशी जी काही संसाधनं आहेत त्यानिशी प्रामाणिकपणे, परिश्रम करून समाधानानं ते जगत आहेत. एकूणच जैन समाज हा पूजापाठ, धार्मिक विधी आणि त्याबरोबर येणाऱ्या कर्मकांडात तन-मन-धन अर्पण करणाऱ्या भाविकांचा आहे. कडक शाकाहारी असल्याने आणि कर्मठ धार्मिक आचार-विचार त्यामुळे जैन लोक व्यसनांपासून खूप दूर आहेत.

असा हा शांतताप्रिय, उद्योगी, धर्मानुरागी जैन समाज जेव्हा रस्त्यावर येतो तेव्हा सगळ्यांच्या भुवया उंचावतात.

गेल्या काही महिन्यांत इतक्या काही गोष्टी घडल्या की आता जैन समाजावर लोक साधकबाधक बोलू लागले. बातम्या येऊ लागल्या, संपादकीयेही लिहिली गेली. त्यांच्या भूमिकेवर परखड मते समाजमाध्यमावर येऊ लागली.

मुंबईतील विलेपार्ले येथील एका सोसायटीतील (नेमिनाथ सोसायटी) जैन मंदिर अनधिकृत असल्याने मुंबई महापालिकेने त्यावर कारवाई केली. ही कारवाई न्यायालयाच्या आदेशानुसार

आणि सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून करण्यात आली, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. या घटनेमुळे जैन समाजात संतापाची लाट उसळली. कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्याची बदली करण्यात आली. सुरुवातीला जैन समाजावर घोर अन्याय केल्याची भावना पसरली, पण यथावकाश ते अनधिकृतच होते हे समजले. त्यामुळे जैनांनी आपलं आंदोलन आवरतं घेतलं.

दर वर्षी पर्युषण पर्व आले की जैनांची सरकारकडे मागणी होते की या काळात कत्तलखाने बंद करावेत. या मागणीबाबत जैन समाजावर बरीच आगपाखड होते. ही मागणी लोकशाहीला, विवेकाला धरून नाही. संविधानाप्रमाणे एका समाजाच्या एखाद्या मागणीसाठी अन्य समाजाला किंवा व्यक्तींना त्याची झळ पोहोचू नये किंवा त्यांना वेठीस धरू नये. प्रत्येक माणसाला खानपानाचे स्वातंत्र्य आहे. सगळेच शाकाहारी कसे असतील म्हणून जैन समाजाच्या या मागणीचे समर्थन कसे करता येईल? त्यामुळे जैन समाजाला इतर समाजाच्या टीकेचे लक्ष केले गेले.

कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठाच्या हत्तीवरून पुन्हा एकदा जैन समाज प्रिंट आणि सोशल मीडियावर तसेच राजकीय पटलावरील चर्चेतून झळकला. या मठातील माधुरी हत्तीला प्रकृतीच्या कारणावरून वनताराला धाडण्यात आले. हे समजतात सांगली, कोल्हापूर भागातील जैनांनी बरीच आगपाखड केली. माधुरी हत्तीला परत आणण्यासाठी मोर्चा काढला. मात्र न्याय, संविधान यांचा आदर करत पर्युषण पर्वाच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन शांतवले.

दुसरी एक बाब म्हणजे मुंबई महापालिकेने कबुतरखाने बंद करण्याचा निर्णय घेतल्यावर जैन समाजाने प्रचंड विरोध केला. खरं म्हणजे कबुतरखान्यांवर असंख्य तक्रारी गेल्या अनेक वर्षांमध्ये महापालिकेत केल्या गेल्या. त्यामुळे कबुतरखान्यांवर कारवाई सुरू आहे, कारण कबुतरांच्या विष्ठेमुळे आणि पिसांमुळे सार्वजनिक आरोग्याचा धोका निर्माण होत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, कबुतरांना खाद्य घालणे हा दंडनीय गुन्हा मानला जातो आणि या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर ५०० रुपये दंड किंवा कायदेशीर कारवाई केली जाते. या कारवाईमुळे काही जैन समुदाय आणि पेटासारख्या संस्थांकडून विरोध झाला. विशेष म्हणजे जैन मुनी नीलेश चंद्र विजय यांनी या निर्णयाविरुद्ध आमरण उपोषणाची घोषणा केली होती. एका मुनींनी तर कबुतरांमुळे फुप्फुसाचे आजार होतात, असे म्हणणाऱ्या डॉक्टरांना मूर्ख संबोधले! असे मुनींसारख्या संयमी, वीतरागी व्यक्तींनी एकांगी आणि भावनिक होऊन बोलणे प्रस्तुत वाटत नाही. खरंतर कुठल्याही समस्यांची विवेकी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून सोडवणूक झाली पाहिजे. मुंबईत आधीच गर्दी आणि प्रदूषण मोठ्या प्रमाणात असताना या कबुतरखान्यांमुळे, उडणाऱ्या धुळीमुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या तज्ज्ञांच्या मतांचा आदर करून कबुतरखाने इतर ठिकाणी हलवण्याचा पर्याय स्वीकारला पाहिजे. मुनींनी समग्र समाजाचा व्यापकपणे विचार करणे अपेक्षित आहे. अहिंसक, शांतताप्रिय जैन समाजाला प्रबोधित करणाऱ्या जैन मुनींचा कबुतरखाने आहेत तिथेच राहिले पाहिजेत हा आग्रह म्हणजे टोकाची भूमिका वाटते. मुळात कबुतर हा पक्षी आणि जैन समाजाचा इतिहास, संस्कृती, तत्त्वज्ञान याचा काडीमात्र संबंध नाही जसा हत्ती, बैल, सर्प ही जैन संस्कृतीची प्राचीन प्रतीके आहेत, मात्र कबुतरांना घेऊन जैनांतील श्वेतांबर पंथ का फडफडत आहे हे कळायला मार्ग नाही. मुनींचा त्याग, विद्वत्ता, विरागी जीवन पाहून त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी, त्यांच्यासमोर नतमस्तक होण्यासाठी सत्ताधारी स्वत:हून यायचे असे एकेकाळी होत असे. असो.

गेल्या महिन्यात पुण्यातील मॉडेल कॉलनी येथील ऐतिहासिक अशी घटना घडली. १९५८ मध्ये हिराचंद नेमचंद दोषी यांनी खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे या उदात्त हेतूने वसतिगृहाची उभारणी केली होती. 'जैन बोर्डिंग'च्या ३ एकर जमिनीच्या कथित विक्रीवरून मोठा वाद पेटला. या विक्रीमध्ये 'राजकीय नेत्यांचा सहभाग' असल्याचा गंभीर आरोप केला गेला. करोडोंची जागा कवडीमोल भावात विकली जात आहे हे समजल्यावर ही बाब जैन समाज आणि इतर सगळ्यांनाच संतापजनक वाटणं साहजिकच होतं. विश्वस्तांपैकी काही ना हाताशी धरून हा व्यवहार झाला होता. पण वेळीच जाग आली आणि सारेच खवळून उठले. सारे बेकायदेशीर सुरू होते. जैन समाजाच्या लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड मोठा मोर्चा काढला. जैन मुनीही त्यात सहभागी होते. सगळेच उघडकीस आल्याने हा डाव उधळून लावला गेला. झालेला विक्री व्यवहार रद्दबातल ठरवला. हे आंदोलन यशस्वी झाले.

अशा प्रकारे गेल्या काही महिन्यांत संख्येने अत्यल्प असणारा जैन समाज या ना त्या कारणाने सतत चर्चेत राहिला हे खरे.

❖❖❖

*(लेखक रयत शिक्षण संस्थेमधून प्राचार्य म्हणून निवृत्त, साहित्य अकादमीच्या शांतीनाथ देसाई यांच्या 'ओम नमो' पुस्तकाचा अनुवाद व त्याचा विद्यापीठीय अभ्यासक्रमात समावेश. लेखक, समीक्षक अन्वय व्यसनमुक्ती संस्थेचे संचालक म्हणून व्यसनमुक्तीच्या कार्यात सक्रिय.)*

(E-mail : ajitbalwant.@gmail.com)

# नेहरूंचा शोध घेताना

■ सविता दामले

साधारण दोन वर्षांपूर्वी अनुवादाच्या निमित्ताने 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथाच्या वाचनात अगदी गढून गेले होते आणि तो ग्रंथ वाचताना मला जणू नेहरूंचाच शोध लागत होता.

१९६४ साली नेहरूंचं निधन झालं, त्यानंतर जसजशी वर्षे गेली तसतसा त्यांनी दिलेल्या वारशाच्या आधारावर देश पुढील वाटचाल करीत असताना त्यांच्या नावाचा उल्लेख दैनंदिन आयुष्यात कमीकमी होऊ लागला, पुढेपुढे तर पुसटही झाला. निसर्गनियमानुसार ते साहजिकही होतं म्हणा. असं असताना अचानक २०१२ साली म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतर ५८ वर्षांनी 'whatsapp'चा उदय झाला आणि त्यानंतर नेहरूंबद्दल अचानक विचित्र आणि अर्थातच खोटी माहिती फॉरवर्ड्सच्या रूपात सर्वत्र पसरू लागली. ते फॉरवर्ड्स वाचून कसंतरी होऊ लागलं, बरेचदा हे काही तरी चुकीचं आहे, असं नाही असू शकत असंच वाटू लागलं.

२०११चे अण्णा आंदोलन, २०१२चा whatsappचा उदय आणि २०१४ सालापासून आलेली भाजपची सत्ता यांच्यामुळे भारतातील सर्वसामान्य माणसांच्या जीवनात राजकारण आणि राजकीय विषय यांनी फारच घुसखोरी केली. सदैव 'इलेक्शन मोड'मध्ये राहण्याची एवढी सवय त्याआधी येथे नव्हती. समाजमाध्यमांनीही त्यात खूपच मोठी भर टाकली आणि त्यांच्या चांगल्या स्वरूपासोबत चुकीचं आणि वाईट स्वरूपही लोकांना दाखवलं. तसंच मीडियाही 'गोदी' होऊन बसला.

या व्हॉट्सॲप भडीमाराचा एक उलटा परिणाम म्हणजे नेहरूंची माहिती खरोखर जाणून घ्यावी असंही बऱ्याच लोकांना वाटू लागले. त्यात मीही एक होते. त्यातूनच पुढे वाचन झालं आणि त्यानंतर 'नेहरूंची सावली' हे नेहरूंच्या सुरक्षा अधिकाऱ्यांचे लेखन, तसंच 'नेहरूंची आत्मकथा' आणि 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या दोन महाग्रंथांचे अनुवाद माझ्या हातून झाले.

नेहरूंनी आपली आत्मकथा जून १९३४ ते फेब्रुवारी १९३५ या काळात तुरुंगात असताना लिहिली आहे. बाहेर आल्यावर पुढे त्यांनी १९३६ सालापर्यंत त्यात थोडी भर टाकली. परंतु त्यानंतर कामात गढून गेल्यामुळे आत्मचरित्र या रूपात त्यांना काही लिहिता आलं नाही. मी ते पुस्तक सर्वप्रथम पाहिलं तेव्हा फक्त १९३६ सालापर्यंतच हे पुस्तक आहे असे कळल्यावर मला हळहळ वाटली खरी परंतु ते पुस्तक वाचता वाचता त्याचा आवाका पाहून मी थक्क झाले. त्यात नेहरूंनी काश्मीरमधील त्यांच्या तीन-चार पिढ्यांची आठवण सांगितली आहे. ते काश्मिरी ब्राह्मण होते. काश्मिरातून त्यांचे कुटुंब खाली मैदानी प्रदेशात कसं आलं? त्यांचे खापरपणजोबा संस्कृत आणि फारसी विद्वान होते, त्यांना दिल्ली दरबारात पद मिळालं, १८५७च्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांच्या कुटुंबाची झालेली वाताहत आणि आग्र्याला केलेलं स्थलांतर अशा घटना त्यांनी सांगितल्या आहेत. त्यांचं बालपण, इंग्लंडमधील हॅरो येथे १६व्या वर्षी शिकायला जाणं, पुढे केंब्रिज येथे शिकणं, बॅरिस्टरची पदवी घेऊन भारतात परतणं अशा गोष्टी त्यात विस्ताराने येतात. येथे परत आल्यावर गांधीजींशी त्यांची भेट झाली आणि ते भारावून गेले. गांधीजींची आज्ञा मानून ते खेड्यात गेले आणि तिथली गरीब शेतकऱ्यांची परिस्थिती पाहून हेलावून गेले. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्या पंडितजींच्या मनात तीव्र संवेदनशीलता होती आणि त्यातूनच त्यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून बॅरिस्टरीचा व्यवसाय न करता इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला झोकून दिलं. त्यांचे पिता मोतीलाल नेहरू यांनीही त्यांना तसं करण्यापासून अडवलं नाही हेही विशेषच म्हणावं लागेल. अन्यथा 'शिवाजी जन्मावा पण शेजारच्या घरी' अशी परिस्थिती असते. परंतु स्वत: मोतीलाल यांनीही स्वातंत्र्यलढ्यात आपल्या पुत्रासह उडी घेतली. त्यानंतर पुढे आनंदभवन ही आपली कित्येक कोटींची मालमत्ताही त्यांनी देशाला अर्पण करून टाकली. त्या काळात किंवा अगदी कुठल्याही काळात हे केवढं प्रवाहाविरुद्ध पोहणं होतं हे आज लक्षात येतं.

नेहरूंनी स्वातंत्र्यलढ्यात दीर्घकाळ जवळजवळ नऊ वर्षं तुरुंगवास भोगला, त्यापैकी १९४२ ते १९४५ अशी तीन दीर्घ वर्षं अहमदनगरच्या किल्ल्यातील तुरुंगात असताना त्यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा महाग्रंथ लिहिला आणि त्याच्या रूपात जणू भारताच्या इतिहासाचा आणि खुद्द त्यांच्या स्वत:च्या काळाचाही

आरसाच पुढल्या पिढीच्या हाती ठेवला. आज इंग्रजी साहित्यातील 'क्लासिक' (अभिजात) ग्रंथांच्या यादीत त्याचा समावेश आहे.

'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' म्हणजेच भारताचा शोध घेताना नेहरू पार मोहेंजोदारो, आर्यांचे आगमन अशा पुरातन काळापासून पुढे बौद्ध धर्म, सम्राट अशोक असा पुढला पुढला काळ घेत स्वत:च्या काळापर्यंत पोहोचले आहेत. इतिहास जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी तर हे मोठं घबाडच आहे असं म्हणावं लागेल. त्याचसोबत 'इतिहास कसा लिहावा?' याचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला आहे. तो ब्रिटिशांच्या वसाहतवादी दृष्टिकोनातून लिहिता कामा नये किंवा कट्टरतावाद्यांच्या संकुचित आणि वैमनस्य निर्माण करणाऱ्या दृष्टिकोनातूनही लिहिता कामा नये. म्हणूनच नेहरूंनी या इतिहासातून वर्तमानकाळासाठी काय धडा घ्यावा आणि आपला भविष्यकाळ चांगला करण्यासाठी काय करावं या नजरेनं पाहिलं. या लेखनासोबत त्यांच्या रोजच्या आयुष्यातील काही संदर्भही आपोआपच आले आहेत. त्यामुळेच हे लेखन जिवंत तर झालं आहेच पण त्याशिवाय त्यांनी १९३६ सालच्या पुढची आत्मकथा लिहिली नाही याबद्दल मला वाटणारी हळहळही थोडी कमी झाली हे नमूद करावंच लागेल. ते तुरुंगात असताना दुसरं महायुद्ध चालू होतं, त्या काळातली जगाची आणि भारताची स्थिती त्यांच्या नजरेतून आपल्याला दिसते. महायुद्ध संपल्यावर सर्वात प्रबळ राष्ट्र म्हणून अमेरिका पुढे आली आणि वसाहतवादाचा अंत होऊन सर्वच परतंत्र देशांना स्वातंत्र्य मिळणार असं जाणवू लागलं. परंतु इंग्लंड, फ्रान्ससारख्या साम्राज्यवादी देशांना हातची सत्ता सोडायची नव्हती. तेव्हाचा तो आशानिराशांचा खेळ आणि ती आंदोलनं या लेखनातून स्पष्ट दिसतात. इंग्रजी सत्ता येथे कायम राहण्यात जमीनदार, सावकार, शेटजी, संस्थानिक अशा ज्या लोकांचा स्वार्थ होता अशा सर्वच लोकांनी आणलेल्या अडचणी आणि त्याविरुद्ध गांधीजी आणि काँग्रेससोबत उभी राहिलेली सामान्य जनता याबद्दल नेहरू विस्ताराने लिहितात. फाळणी का नको आणि बाह्य म्हणजे इंग्रजांचा हस्तक्षेप नसेल तर आम्ही आपापसात हे सर्व प्रश्न सोडवू शकतो याबद्दलही त्यांनी विस्तारानं लिहिलं आहे. अल्पसंख्याकांची कट्टरता आणि बहुसंख्याकांची कट्टरता या दोन्हींवर नेहरूंनी टीका केली. ते म्हणाले की एका कट्टरतेचा उपाय दुसरी कट्टरता असू शकत नाही. उलट या दोन्ही कट्टरता एकमेकींच्या आधाराने वाढतात आणि पुष्ट होतात. या सगळ्या कट्टर संघटना (राष्ट्रीय स्वयंसेवक संघासह) हुकूमशाही प्रवृत्तीच्या आहेत हे त्यांनी खूप लवकर ओळखलं होतं आणि म्हणूनच त्यांना नेहरूंवर दावा सांगता येत नाही, म्हणूनच त्यांच्याबद्दल इतका राग आहे.

त्याशिवाय नव्या भारताचं-औद्योगिक भारताचं जे स्वप्न त्यांनी पाहिलं होतं त्याबद्दलही त्यांनी खूप विस्तारानं लिहिलं आहे. ही त्यांची दूरदृष्टी आणि अभ्यास पाहून थक्क व्हायला होतं. सुदैवाची गोष्ट अशी की स्वातंत्र्यानंतर त्यांनी मनात जे भारताविषयी योजलं होतं त्यातल्या बऱ्याच गोष्टींची पायाभरणी करण्याची संधी त्यांना मिळाली हे भारतीय म्हणून आपलंही भाग्यच म्हटलं पाहिजे. १९४५ साली जे लेखन लिहून संपलं त्या काळाच्या चौकटीची मर्यादा असूनही नेहरू भविष्यात पुढे पाहू शकत होते हे खरोखरच महानतेचं लक्षण म्हणायला हवं, म्हणूनच 'हिंद के जवाहर' ही पदवी ते सार्थ करतात.

स्वातंत्र्यानंतर भारतात लोकशाही यावी यासाठी गांधी, नेहरू आणि काँग्रेसचे सर्वच लोक ठाम होते. इंग्रजांनी देशाला पार कंगाल करून सोडलं होतं, परंतु दीडशे वर्षे त्यांनी आपली वाट लावली, आता मी काय करू? असे न म्हणता नेहरूंनी सर्वांना एकत्र आणि समान पातळीवर बरोबर घेऊन जायचं ठरवलं कारण देशाची प्रगती होण्याचा तो एकमेव विवेकी मार्ग होता. काही संकुचित मनोवृत्तीच्या लोकांना तो पटला नाही म्हणून त्यांना गांधीजींबद्दल द्वेष वाटतो, नेहरूंची बदनामी करावीशी वाटते. परंतु स्वातंत्र्यापश्चात आपण सर्वांना समान लेखणारी राज्यघटना स्वीकारली हे काळाविरुद्ध उचललेलं खूप मोठं पाऊल होतं हे आपण कधीच विसरता कामा नये. आत्तापर्यंतचा आपला इतिहास बघता हे अभूतपूर्वच पाऊल म्हटलं पाहिजे. ते पाऊल आपण १९४७ साली उचललं असलं तरी माणसांच्या मनोभूमिका आणि विचार बदलण्यासाठी, हितसंबंधीयांचा विरोध नष्ट करण्यासाठी खूपच कष्ट घ्यावे लागणार आहेत. घोडामैदान तर अजून खूपच दूर आहे. या लोकशाहीच्या बदल्यात अन्य कुठलीही 'शाही' आली तरी ते कवी केशवसुत लिहितात तसे, 'दिले हिरण्मय हाती मृण्मय हा हतविनिमय' म्हणजे सोनं देऊन त्या बदल्यात मातीचे फुटके खापर विकत घेतल्यासारखेच आहे. सदैव लक्षात ठेवण्यासारखाच धडा आहे हा, असं आजच्या पार्श्वभूमीवर 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे पुस्तक वाचताना मला वाटलं.

❖❖❖

*(ज्येष्ठ मराठी अनुवादिका,*
*पंडित जवाहरलाल नेहरूंच्या साहित्याचे अभ्यासक.)*

(E-mail : savitadamle@rediffmail.com)

# ।। कविता ।।

## आप्पा ठाकूर

### सांजवात

चंद्राचं सोड गं,
आजकाल काळोखही
निमूट थांबत नाही दारात
तेव्हा प्रश्न उभा राहतो
सांजवात लावण्याचा
तू म्हणशील,
सांजवातीची वेळही
सांभाळता येत नाही यांना
पण तसं नाही गं,
इथला सगळाच प्रकाश
तुझ्या सोबत गेल्यानं
उरला अंधारही काळवंडलाय
तेव्हा-
सांजवात मागेपुढे होते, एवढंच!

❖

### समाधी

समाधी...
निर्वाणीच्या अखेरच्या क्षणी
माझे दोन्ही हात
हातात घेऊन
ती म्हणाली,
'माझ्यासाठी एवढं कर...'
मी विचारलं,
'का करू?
ती म्हणाली,
'दारात आलेल्या कुणालाही रिक्त पाठवू नकोस
आणि...
......
शिलकीत काही नसेल तर
निदान स्नेहाचे दोन शब्द तरी पदरात टाक'
मी म्हणालो
'ठीक आहे.'
...पण आता शब्दांनाच
मौनत्व आलं त्याचं काय?

❖

### बापू

निकड म्हणून
देशाचे रीतसर
दोन भाग केलेत...
तर यांनी,
तुमच्या छातीवर
बिनदिक्कत गोळी धरली
आता त्यांचेच वंशज
पूर्ण देशाला तुकड्यांनी
कापायला निघालेत
त्यांच्या छाताडावर
नाही वार करू शकत बापू
कारण
अहिंसेचे अवघड शस्त्र
विनाकारण तुम्हीच
आमच्या हाती सुपूर्द केलेत
तुमचा काळ निराळा
म्हणून तुम्ही
बुद्धाच्या वाटेवरून
निमूट चालू शकलात बापू
आता बुद्ध पचतच नाही
तेव्हा,
हिंसेचा प्रतिवाद
हिंसेनेच करायला
तुमच्या उजव्या हातातील
ती कृश काठी, जाताना
आमच्या हवाली
करायला हवी होतीत बापू

❖

# अत्र तत्र सर्वत्र...
# मुसलमान!

■ **तमन्ना इनामदार**

हल्ली देशात सगळीकडे आलबेल आहे. लोक सुखी-समाधानी आहेत. 'सबका साथ सबका विकास' होत आहे. प्रत्येक हाताला, त्या हाताच्या कुटुंबीयांना मोफत रेशन मिळते आहे. मुसलमानांची बदनामी करणे, ट्रोलिंग आणि दर्गा मस्जिदसमोर मोठ्याने डीजे लावून गुलाल उधळत हातात तलवारी नाचवत बेभान होऊन नाचण्यात देशातला तरुण मश्गूल आहे. सगळ्या गरजा, अभाव विसरून धर्मरक्षणासाठी सार्वजनिक उत्सव उन्मादात साजरा होत आहे. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी तर देशातील जनता आनंद विभोर होते आहे. JSRचा नारा देत प्रचारक घाम गाळतो तेव्हा ना रोटीची भ्रांत असते ना नोटांची ददात... बाटलीतली रंभा मनमस्तिष्काचा कब्जा घेऊन सगळी दु:खं विसरायला लावते. सगळे कसे आलबेल सुरू आहे! हा केवळ एका जुमल्यावर उभा केलेला डोलारा आहे... मुसलमान! अत्र तत्र सर्वत्र... केवळ मुसलमान!

इथला हिरो मुसलमान, शत्रू मुसलमान, देशद्रोही मुसलमान, धर्माआड येणारा मुसलमान, विकासात अडथळा ठरणारा मुसलमान, राजकारण्यांना निष्क्रिय बनवणारा मुसलमान, निवडणूक जिंकून देणारा मुसलमान, लव्ह जिहाद करणारा मुसलमान, गोमांस विकणारा-खाणारा मुसलमान, भ्रष्टाचार करायला लावणारा, कोरोना पसरवणारा मुसलमान, कश्मीर फाइल्स- केरला फाइल्सला कारण ठरणारा मुसलमान, स्फोटाचे खरे आरोपी शोधण्यात अडथळा आणणारा मुसलमान, रस्त्यावर नमाज पडून रस्ते अडवणारा फक्त मुसलमान... बास! या मुसलमानांमुळे घडणाऱ्या, घडलेल्या, घडू पाहणाऱ्या घटनांविषयी लिहायला पानं पुरणार नाहीत. आणखी वर्णन नको. कारण वाचक या देशाचे सुजाण, डोळे, मेंदू उघडे असणारे नागरिक आहेत. ये पब्लिक सब जानती है!

वर वर्णित मुसलमान तो जो स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही दारिद्र्यरेषेच्या खालून वर डोके काढू न शकलेला भारताचा नागरिक. जो त्याच्याच जाती धर्मांतर्गत असणाऱ्या धार्मिक, लादलेल्या, सोडवता न आलेल्या अनेक समस्यांच्या ढिगाऱ्यात अडकलेला आहे. जो या देशावरील अतूट प्रेमाखातर इथेच राहिला आणि याच मातीत दफन होण्याची ख्वाईश ठेवणारा आहे. तो मुसलमान जो सच्चर कमिटी महमदूर रहमान व तत्सम कमिटीच्या अहवालात जगण्याच्या किमान गरजाही पूर्ण करू न शकणारा घटक ठरला. तो मुसलमान ज्याला या जगण्याशी, या जगाशी नाळ न बांधता 'मरने के बाद की जन्नत' कमावण्यासाठी घर ते मस्जिदच्या पाच वेळा इमानेइतबारे चकरा घालत नेकी कमावण्यात व्यस्त असतो. तो मुसलमान जो घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे 'अल्ला सब देख लेगा' म्हणत दैववादी, अल्लाहवादी होत जगतो. त्या मुसलमानाला 'शंभरावतारी' ठरवत इथली व्यवस्था इथल्या बहुजनांना भीती दाखवत खुर्चीला घट्ट चिटकून राहण्यात यशस्वी होते आहे. लोकांना आपल्या हातातील बाहुले बनवून इप्सित कार्य साधून घ्यावयाचे असल्यास त्यांना धर्म नावाची गोळी द्यायची. तूच खरा धर्माचा रक्षक आहेस. तू महान आहेस. तुझ्याच हातून शत्रूचा काटा काढू आणि तो शत्रू मुसलमान आहे. हे विष इथल्या शालेय मुलांपासून तरुणांपर्यंत भिनवण्यात इथली यंत्रणा, संघटना, सत्ताधारी,

संपत्तीधारक यशस्वी झाले.

वर्तमानपत्र, सोशल मीडिया, टीव्ही चॅनल्सवर विळखा घातलेल्या धनदांडग्या अजगरांनी या माध्यमांचा धूर्तपणे वापर करत सत्य लपवले, खोटे पसरवले आणि द्वेषाचे रंग समाजमनावर उडवून धर्मांध बनवले. दररोज या माध्यमात डोकावताच जिहाद, अजान, दर्गा मस्जिद खाली मंदिर, लव्ह जिहाद, शिक्षण जिहाद, नोकरी जिहाद, मुसलमान फुंकला- थुंकला अशा फेक बातम्या प्रसारित करत मुसलमान आणि अल्पसंख्याकांचे जगणे अशक्य करून सोडले आहे. मुसलमान मुसलमान शब्दाचा जप केल्याशिवाय यांचा ना दिवस उगवतो ना रात्र होते ना अन्न गोड लागते. लाखो-करोडो रुपयांची भाड्याची ट्रोलिंग गाढव जमात आपापला मेंदू डोक्यातून काढून डस्टबिनमध्ये ठेवत शेंडा दांडा नसलेल्या, कुठलाही पुरावा वास्तव आधार नसलेल्या बातम्या ओकत असतात. मिळणाऱ्या बिनमेहनतीच्या कमाईमुळे समाजात अशांतता, दंगे, हिंसा, भ्रष्टाचार, अस्थैर्य पसरतो आहे, देश बरबादीकडे जात आहे, याची यांना तमा नाही. इतके सगळे भावनिक वैचारिक बोथट झालेले आहेत आणि यावर कहर म्हणजे या देशातील विवेकी सुज्ञ बहुजन जनता यांच्या जाळ्यात डोळे बंद करून अडकते आणि फेकलेले खोटे द्वेषभारित मुद्दे खरे मानत चघळते. खोट्या बातम्या फेक व्हिडीओचे फॅक्ट फाइंडिंग करण्याची व्यवस्था याच सोशल मीडियाने करून ठेवलेली असताना खरे सत्य शोधून गुन्हेगारांना, घडणाऱ्या घटनांना लगाम लावण्यासाठी सत्यशोधन करण्याची तसदीही न घेता बहुजन झुंडीत सामील होत आहेत. या बनावट राष्ट्रप्रेमींचे फावते कारण खरे राष्ट्रप्रेमी यांच्या खोट्याला, अफवेला, फेक जुमल्याला सत्य मानून मौन धारण करून आहेत. अनेक नामचीन आणि महत्त्वाच्या क्षेत्रात असणाऱ्या व्यक्तींचे, नेत्यांचे जावई मुसलमान आहेत. यांच्या मुली त्या मुसलमानांबरोबर सुखात वैवाहिक जीवन जगतात तेव्हा लव्ह जिहाद होत नसतो. लव्ह जिहाद फक्त गरीब मध्यमवर्गीय नागरिकांनी आंतरधर्मीय विवाह केल्यावर होतो. सप्टेंबरमध्ये जामनेर जिल्ह्यातील वीस वर्षीय, एकुलत्या एक असणाऱ्या तरुणाला झुंडीने लव्ह जिहादच्या केवळ संशयावरून हाल हाल करून जिवे मारून त्याच्या घराच्या दारात फेकून दिले. त्या भक्तांना आणि उचकवणाऱ्या नेत्यांना हे माहीत असूनही कसे इतके क्रूर व बेभान होतात. दररोज रस्त्यावर उतरून निम्न दर्जाची नोकरी व छोटासा फिरता व्यापार करून रोटी कमावणाऱ्यांना बाजारात दुकाने लावण्यावर बंदी घालणारे हे स्वयंघोषित जिल्ह्याच्या मालकांना त्यांचे अनुयायी विचारत नाहीत की दुबईच्या शेखशी यांना व्यवहार चालतो, तालिबानींची देशात बोलावून मेहमान नवाजी चालते. मग इथला गरीब अल्प उत्पन्न असणारा मुसलमान कष्ट करून खात असेल तर त्याच्या रोजी रोटीचा मार्ग का हिरावून घ्यायचा?

फेक व्हिडीओ बनवून, वेश बदलून गैरकृत्य करणाऱ्यांना प्रश्न विचारायला हवा, रील बनवून प्रसिद्धीचा रियाज करण्यासाठी मुसलमान घरात चालतो, टोपी घालून रोजा विस्तार पार्टी चालते, गल्फ चादर घेऊन दर्ग्यात गेलेले चालते... तर गरीब अशिक्षित कष्टकरी झोपडपट्टीतला मुसलमानच का टोचतो?अल्लाह हाफिज म्हणत अल्लावर हिफाजत सोडून हिंदू मुस्लीमचा डीएनए एकच आहे म्हणायचा आणि मुसलमानावर गणवेशात झुंडीने येऊन जीवघेणे हल्ले करायचे. वर त्यांच्याच नावाने एफ.आय.आर. ही नोंदवायची म्हणजे मुसलमानांचे मूलभूत हक्कही नाकारायचे यामागची कारणे लोकांना न करण्याइतके लोक मूर्ख नाहीत. दसऱ्याच्या, गांधी जयंतीच्या दिवशी चार पिढ्यांपासून एकत्र राहणारे सुखदु:खात सामील होणारे मित्र, सत्तेवर असणाऱ्या आमदाराच्या छत्रसावलीत असणारा मित्र त्याच्या मुसलमान मित्रावर जीवघेणा हल्ला करतो, फरार होतो. त्याला अटक होत नाही. उलट पीडित जखमी बेशुद्ध असताना त्याच्यावरच ॲट्रॉसिटी दाखल होते त्याची एफआयआर नोंदवून घेतली जात नाही. पुढे त्याच्या मेंदूचे मोठे ऑपरेशन होते तो व्यक्ती प्यारालाइज्ड होतो तरी त्यालाच बेलसाठी कोर्टात खेटे घालावे लागतात, हा कुठला न्याय?

हे द्वेषाचे, दहशतीचे लोण कोणा एकाच जाती-धर्मावर अत्याचार करून थांबणार नाहीत. हळूहळू सबकी बारी आयेगी! राहत इंदोरी साहब म्हणतात... लगेगी आग तो जद मे आयेंगे घर कई, यहा पर सिर्फ हमारा मकान थोडेही है! सभी का खून शामिल है इस मिट्टी मे किसी के बाप का हिंदुस्तान थोडेही है!

माझी विनंती आहे आम्ही भारताच्या लोकांना सत्याची कास धरून संशोधन करायला हवे. चुकीचे वागणाऱ्याला, गुन्हेगाराला सत्य पुराव्यांच्या आधारे नक्की शिक्षा होऊ द्या. हा देश विविध धर्म, जाती, भाषा संस्कृतीच्या धाग्यांनी विणलेला आहे. हे धागे उसवले वा ही वीण सैल झाली तर देशाची घडी विस्कटेल आणि देश उत्कर्षापासून, उन्नतीपासून, सुख-आनंदापासून दूर जाईल. तसे व्हायला नको असेल तर आज आणि आत्तापासून आपल्या सदसद्विवेकाला जागून सतर्क राहायला हवे आणि लोकशाहीची मूल्य जपत सर्वसमावेशक जीवन रचनाचा, संवैधानिक हक्क, अधिकाराचा आदर करायला हवा.

❖❖❖

*(मुस्लिम समुदाय व स्त्रीयांच्या प्रश्नांच्या अभ्यासक, लेखिका, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या.)*

(E-mail : tamannainamdar707@gmail.com)

# पितृसत्ताक कुटुंब आणि स्त्री

■ अमृता आपटे

भारतीय समाजात कुटुंब व्यवस्था ही कायमच मूलभूत आणि महत्त्वाची राहिली आहे. भारतीय कुटुंबं ही पारंपरिक मूल्यांच्या पायावर उभारलेली असतात. ही कुटुंबं पितृसत्ताक असतात जिथे स्त्रियांचे स्थान दुय्यम असते. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये कुटुंबातला ज्येष्ठपुरुष हा कुटुंबाचा प्रमुख असतो. पुरुषाचे विचार, मत, आवडनिवड, आरोग्य, शिक्षण ह्याचा कुटुंबात प्राधान्याने विचार केला जातो. मुलांकडे भविष्यातला कर्ता म्हणून बघितले जाते तर मुलीकडे परक्याचे धन म्हणून बघितले जाते.

पितृसत्ताक कुटुंबं पद्धती कशी अस्तित्वात आली हे अभ्यासले तर लक्षात येते की माणूस शिकारी अवस्थेत असताना, टोळीत राहात असताना, स्त्री-पुरुषांचे खरे म्हणायचे तर नर आणि मादी दोघांच्या कामांची विभागणी ही त्या त्या परिस्थितीला अनुसरून होती. मुलाच्या जन्मानंतर स्त्रीला मुलाला दूध पाजण्यासाठी, मुलाला वाढवण्यासाठी त्याच्याबरोबरच राहावे लागे. मुलांच्या रक्षणाची जबाबदारी स्त्रिया गटाने पार पाडत तर पुरुष शिकारीसाठी बाहेर पडत असत.

माणसाला शेतीचा शोध लागला तसे त्याने वसाहत करून राहायला सुरुवात केली. शेत म्हटल्यावर शेतीची मालकी आली, धान्याची साठवण आली आणि त्यातूनच मग आपली मालमत्ता आपल्या वारसाकडेच जावी ही मागणी जोर धरू लागली. ह्याच दरम्यान पुरुषाला टोळीत राहणे गैरसोईचे वाटू लागले, कारण जन्मणारे मूल कुठल्या स्त्रीचे हे ठाऊक असायचे; पण कुठल्या पुरुषाचे आहे ते मात्र ठाऊक नसायचे. त्यामुळे आपला वारस/आपले मुलं निश्चित करायचे तर स्त्रीने घरात बंदिस्त होण्याची गरज पुरुषाला वाटू लागली आणि त्यातूनच कुटुंब व्यवस्था निर्माण झाली.

शेतीच्या उदयानंतर सामाजिक उतरंडीलाही सुरुवात झाली. ज्या शेतकऱ्यांची मालमत्ता सगळ्यात जास्त तो वसाहतीचा प्रमुख म्हणून काम करू लागला. राजसत्तेचा उदय झाल्यावर, जास्त उत्पादन करण्यासाठी, युद्धावर जाण्यासाठी जास्त लोकांची गरज भासू लागली. त्यानुसार पुरुषांना युद्धावर जाणे भाग पाडले गेले आणि स्त्रियांना घरी राहून मुलांना जन्म देणे बंधनकारक केले गेले. युद्धावर जाण्यास तयार नसलेल्या पुरुषाची चेष्टा केली जायची आणि मुलं जन्माला घालण्यास अनुत्सुक असणाऱ्या स्त्रीची पण हेटाळणी केली जायची. हळूहळू स्त्रिया सार्वजनिक जीवनातून गायब होत कुटुंबात स्थिरावल्या आणि अशा तऱ्हेने पुरुषप्रधान राज्यसत्तेने स्त्री आणि पुरुषांच्या वेगळ्या अशा भूमिका आखून दिल्या. म्हणजेच राज्यसत्तेच्या उदयानंतरच लिंग आधारित भेदभावाला सुरुवात झाली.

समाज व्यवस्था टिकवून ठेवायची तर कोणा एकाच्या हातात सत्ता असणे आणि दुसऱ्याने सत्तेचे अनुयायी असणे गरजेचे असते ही दृढ होत गेलेली संकल्पना कुटुंबातही रुजली आणि त्यातूनच पितृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात आली. कुटुंबातील ज्येष्ठ पुरुषाच्या हातात सत्ता केंद्रित झाली तर स्त्री ही सत्तेची अनुयायी बनली. तेव्हापासून स्त्री आणि पुरुष दोघांचे वर्तन, त्यांच्या जबाबदाऱ्या ह्यांचे साचे बनवले गेले. पुरुष हा खंबीर, आक्रमक, महत्त्वाकांक्षी असतो हे गृहितक मांडले गेले. दुसरीकडे स्त्री ही हळवी, कोमल, नाजूक, सुंदर, पुरुषावर अवलंबून असणारी, कुटुंब आणि मुलांमध्ये रमणारी हे गृहितक मांडले गेले आणि त्या साच्यात स्त्रीने बसण्याची सक्ती तिला करण्यात आली. तीच परंपरेने चालत आलेली पितृसत्ताक कुटुंब पद्धती अजूनही भारतात अस्तित्वात आहे. ह्या कुटुंब व्यवस्थेत स्त्रियांच्या हक्कांची होणारी पायमल्ली आपण समजून घेऊ.

भारतीय कुटुंबात, संपत्तीचा वारस म्हणून मुलगा महत्त्वाचा ठरतो. 'वडिलांचे अंत्यसंस्कार मुलाने केले तरच वडिलांना मोक्ष मिळतो' ही समजूत असल्याने भारतीय समाजात, मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाते तर मुलीकडे परक्याचे धन म्हणून बघितले जाते. मुलीच्या लग्नात हुंडा द्यावा लागेल ह्या आर्थिक जबाबदारीच्या भीतीपोटी स्त्री भ्रूण हत्येच्या घटना घडताना दिसतात. गरीब कुटुंबात पूर्ण कुटुंबाला पौष्टिक आहार मिळणे कठीण असते अशा वेळी मुलाच्या पोषणाकडे जास्त लक्ष दिले जाते परिणामी मुलींमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त दिसून येते. भारतात अजूनही ग्रामीण भागात जिथे स्त्रियांच्या सुरक्षिततेचे प्रश्न गंभीर

आहेत तिथे काळजीपोटी मुलींचे लहान वयात लग्न लावून दिले जाते.

वरील टोकाच्या घटना वगळल्या तरी कुटुंबात मुलींना भेदभावाला सामोरे जावे लागते. भावा-बहिणीमध्ये भावाच्या शिक्षणाला जास्त महत्त्व दिले जाते. मुलीवर जास्त खर्च केला तर ती सासरी जाणार आणि शेवटी सासर हेच तिचे खरे घर असे मानले जाते. मुलींनी गृहकृत्यदक्ष असावे ही अपेक्षा केली जाते त्यामुळे आईबरोबर घरातील कामाच्या जबाबदाऱ्या मुलींना वाटून दिल्या जातात. मुलांना मात्र घरकाम शिकवले जात नाही, परिणामी घरातील स्वत:च्या छोट्या छोट्या गोष्टींसाठीही मुलगे आईवर किंवा बहिणीवर अवलंबून राहायला लागतात.

मुली साधारण अकरा-बारा वर्षांच्या झाल्या की वयात येतात, त्यांची मासिक पाळी चालू होते. शरीरात होणाऱ्या बदलाबरोबर त्यांच्यात मानसिक बदलही होत असतात. मासिक पाळी म्हणजे काही तरी अपवित्र, अस्वच्छ असे स्त्रीच्या मनावर सतत ठसवले जाते. मासिक पाळी ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण त्याविषयी भीतीचे वातावरण केल्यामुळे मुलींना स्वत:च्या शरीराबद्दल संकोच आणि लाज वाटायला लागते. वयात येत असतानाच मुलींच्या मनात आकर्षण ही निसर्गसुलभ भावना नव्याने उमलत असते. ह्या वयात मुली स्वत:चा नव्याने विचार करायला लागतात. आपण छान दिसावे, सजावे, चारचौघात उठून दिसावे असे त्यांना वाटत असते. पण घरची पुरुष मंडळी तिच्या वागण्यावर बंधने घालू बघतात. स्त्रीने स्वत:च्या आवडीनुसार सजणे, कपडे घालणे कुटुंबात स्वीकारले जात नाही कारण स्त्री तिच्या वागण्यातून इतर पुरुषांना आकर्षित करत असते, असा समज दृढ असतो.

स्त्रीचे कौमार्य आणि लैंगिक शुद्धता राखणे ही पुरुष नातेवाईकांची जबाबदारी मानली जाते. परंपरेनुसार, स्त्रीने प्रथम वडील, मग भाऊ, लग्नानंतर पती आणि नंतर मुलगा ह्यांच्या आज्ञेत राहणे अपेक्षित असते. मुलीने कुटुंबाच्या मर्जीविरुद्ध प्रेमविवाह केल्यास कुटुंबाच्या प्रतिष्ठेला धक्का लागतो असा समज कुटुंबात असतो. मुलीने आंतरजातीय विवाह केल्यास, जातीव्यवस्थेच्या नियमांचे उल्लंघन केले जाते आणि कुटुंबाची प्रतिष्ठा धोक्यात येते हा समज असतो. आंतरजातीय विवाह करून मुलीने घराण्याला कलंक लावला आणि त्याची तिला शिक्षा केली पाहिजे ह्या सूडाच्या भावनेतून काही कुटुंबं मुलीशी सबंध तोडून टाकताना दिसतात आणि ह्याच विचारातून, कधी अगदी टोकाला जाऊन ऑनर किलिंगसारख्या घटनाही घडताना दिसतात.

एकत्र कुटुंब पद्धतीत नवरा बायकोला प्रेम व्यक्त करण्यात मर्यादा येतात. नवरा बायकोच्या नात्यात प्रेम, आदर असेल तरच स्त्रीला सेक्समध्ये आनंद मिळू शकतो. पण स्त्रीच्या भावनिक गरजांकडे दुर्लक्ष केले जाते परिणामी सेक्स ही स्त्रीला बऱ्याचदा जबरदस्ती वाटायला लागते. संतती नियमनाची जबाबदारीही स्त्रीवरच टाकली जाते. नियमितपणे गर्भनिरोधक गोळ्या घेणे स्त्रियांना गैरसोईचे वाटते. अशा वेळी नवऱ्याने निरोध वापरणे हा जास्त सुलभ पर्याय उपलब्ध आहे. असे असतानादेखील बहुतेक पुरुष निरोध वापरायला तयार नसतात, कारण निरोध वापरल्याने शरीरसुखात उणीव भासते असा पुरुषांचा समज असतो. यातूनच नको असलेल्या गर्भधारणेला स्त्रीला सामोरे जावे लागते. कुटुंब नियोजनासाठी पुरुष नसबंदी हा सोपा पर्याय उपलब्ध असतानादेखील स्त्रियांनाच नसबंदी शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागते.

स्त्रिया आता घरातून बाहेर पडून काम करू लागल्या तरी पुरुष तितके घरातली जबाबदारी घेताना दिसत नाहीत. परिणामी स्त्रियांना घर आणि दार दोन्हींकडचा मानसिक आणि शारीरिक ताण सहन करावा लागतो. आताची स्त्री अर्थार्जन करायला लागली तरी घरचे आर्थिक निर्णय बहुतांश वेळा नवराच घेत असतो. पैसे कोठे खर्च करायचे, कोठे गुंतवायचे हे प्रामुख्याने नवरा ठरवत असतो आणि मालमत्ताही पुरुषाच्या नावावरच असते.

कुटुंबातील स्त्रियांच्या कलहामागे आपली पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थाच करणीभूत आहे. घरातील स्त्रीचे मूल्य हे ती पुरुषाला किती खूश ठेवते किंवा ती पुरुषासाठी किती त्याग करते यावर अवलंबून असते. घरच्या पुरुषाला खूश करायला, त्याचे मन जिंकून घ्यायला म्हणून कुटुंबातील स्त्रियांमध्ये स्पर्धा चालू होते आणि त्यातून असूया आणि ईर्षा वाढीला लागते ज्याची परिणती कौटुंबिक कलहात होते.

स्त्रीने घरच्या सगळ्यांची सेवा करत घरच्या ज्येष्ठ लोकांची मनं जिंकून घेणं अपेक्षित असते. घरच्या ज्येष्ठ सदस्यांनी आपली दखल घ्यावी म्हणून स्त्रिया रीतिरिवाज, परंपरा ह्याची चौकट नकळतपणे पाळायला शिकत असतात. घरच्या परंपरा राखण्याची जबाबदारी घरातील ज्येष्ठ स्त्रिया स्वत:कडे घेतात आणि इतर कनिष्ठ स्त्रियांचा वावर, कामाची निवड, त्यांचे कपडे ह्यावर त्या लक्ष ठेवायला लागतात.

कुटुंबात दुय्यम स्थान अनुभवलेल्या, कटू अनुभव घेतलेल्या स्त्रिया आतून अशांत आणि दु:खी असतात. मग घरात नव्याने लग्न होऊन आलेल्या स्त्रीवर त्या अधिकार गाजवून आपली उरलीसुरली सत्ता राखायचा प्रयत्न करतात. सासू-सून, जावा-जावा, नणंदा-भावजया ह्यांच्यातील वाद हे स्त्रीच्या घुसमटलेपणाचे, दु:खाचे दाखले आहेत.

भारतीय समाजात मातृत्वाचे उदात्तीकरण केले जाते. प्रत्येक स्त्रीला मातृत्वाची आस असते असाही प्रचार केला जातो. जणू काही आई होणे हे स्त्रीच्या आयुष्यातले अंतिम ध्येय आहे, अशी

शिकवण स्त्रीला दिली जाते. एखाद्या स्त्रीला मूल झाले नाही, तर त्यासाठी तिलाच जबाबदार धरले जाते. कुटुंबात तिला दुजाभाव सहन करावा लागतो, कौटुंबिक, धार्मिक कार्यातून तिला बाजूला ठेवले जाते. त्यामुळे मुलावाचून तिचे जगणे अपूर्ण आहे, असे स्त्रीला स्वत:लाही वाटायला लागते. मुलाच्या जन्माने आपल्या कुटुंबात आपले स्थान निश्चित होईल, कुटुंबात आपल्याला मान मिळेल किंवा मुलाच्या येण्याने घरातील नाती सुधारतील अशा ठाम धारणा मग स्त्रीच्या होऊन बसतात.

गर्भारपणात स्त्रीला अनेक शारीरिक, मानसिक बदलातून जावे लागते, पण ते सगळे सहन करण्यातच तिचे स्त्रीत्व दडले आहे असे भासवले जाते. मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारीही मुख्यत्वे बाईवर असते. मुलांच्या वाढीमध्ये काही कमी-जास्त झाले तर त्याचा दोषही आईलाच दिला जातो. मूल वाढवण्यामध्ये बाईची खूप शारीरिक, मानसिक ऊर्जा खर्च होत असते. स्त्रीला मूल वाढवताना पूर्ण कुटुंबाची साथ असेल तरच घराबाहेर जाऊन काम करणे, कुटुंबाबाहेर आपले कार्यक्षेत्र निवडणे, आपली ध्येय पूर्ण करणे शक्य असते.

ह्या पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत स्त्रीच्या आरोग्याकडेही कळत-नकळत दुर्लक्ष होत असते. इतरांच्या आवडीनिवडी जपता जपता स्त्री स्वत:च्या खाण्यापिण्याकडे दुर्लक्ष करत राहते. मुलांचे, कुटुंबाचे करता करता स्वत:चे आजार स्त्रिया अंगावर काढताना दिसतात. आपल्या आरोग्यासाठी मोठाले खर्च, उपचार कुटुंबाला करावे लागले तर त्याचीही खंत स्त्रीला वाटत असते. स्त्रिया उपासतापास, व्रतवैकल्य ह्यात अडकल्या की त्याचा त्यांच्या तब्येतीवर परिणाम होत असतो. आहारात दुर्लक्ष केल्याने रक्तक्षयाचे प्रमाण स्त्रियांमध्ये जास्त असल्याचे आढळून येते. बहुतेक उपास हे नवऱ्यासाठी, मुलासाठी किंवा भावासाठी असतात. कुटुंबाचे, त्यातल्या पुरुषांचे भले व्हावे ह्या भावनेने स्त्रिया त्यागमूर्ती बनू बघत असतात. मानसिक आरोग्याकडे तसेही भारतीय कुटुंबात अजूनही तितके लक्ष दिले जात नाही त्यात स्त्रीचे आरोग्य तर आणखीच दुर्लक्षित राहते. गृहिणीच्या बाबतीत तर 'ती घरीच असते तिला असे काय काम असते? आणि तिला काय त्रास असणार?' असा विचार केला जातो. गृहिणीच्या आजारी असण्याने कुटुंबाचे उत्पन्न थांबणार नसते त्यामुळे तिच्यापेक्षा कमवत्या पुरुषाचे आरोग्य महत्त्वाचे मानले जाते.

उतारवयातल्या स्त्रीकडे बऱ्याचदा नातवंडांच्या पालनपोषणाची जबाबदारी येऊन पडते. वयस्कर स्त्रीचे आरोग्याचे प्रश्न चालू झाले की, ती कुटुंबावरील जबाबदारी बनून राहते. वृद्धापकाळात स्त्रीची कौटुंबिक नाती बदलत जातात. ज्या घरावर आपण राज्य केले तिथे आता आपल्याला किंमत राहिली नाही ही खंत तिला जाणवायला लागते. निम्न आर्थिक वर्गातल्या स्त्रीचे उत्पन्न थांबले असेल तर नवऱ्याच्या माघारी ती स्त्री मुलावर अवलंबून असते, आर्थिक व्यवहार पूर्वी कधी तिने बघितले नसतील तर तिला सतत मुलाची गरज भासत राहते. ह्या परावलंबित्वामुळे स्त्रीला आतून असहाय वाटयला लागते. हातात स्वत:चा पैसा नसल्याने ह्या स्त्रीचा घराबाहेरचा वावर कमी होतो आणि एकटेपणाने ती वेढली जाते.

पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत स्त्री वैचारिक आणि भावनिक स्वातंत्र्य अनुभवू शकत नाही. स्त्रीत्वाच्या घालून दिलेल्या साच्यात स्वत:ला बसवताना तिची घुसमट होत राहते आणि तिच्या प्रगतीला मर्यादा येतात. स्त्री लहानपणापासून ह्याच व्यवस्थेत वाढलेली असल्यामुळे 'पुरुष प्रथम' हे तिच्याही मनावर बिंबलेले असते. त्यामुळे बऱ्याचदा स्त्रियांना त्यांच्यावर अन्याय होतो आहे हे समजायला, उमजायलाही वेळ जातो. म्हणूनच ह्या लेखाच्या निमित्ताने पितृसत्ताक कुटुंबातील स्त्रीच्या जीवनातले बारकावे समोर आणायचा प्रयत्न केला आहे.

स्त्रियांवर होणारे अन्याय, भेदभाव कमी होऊन त्यांना स्वातंत्र्य, सन्मान, समान संधी मिळाल्यास त्यांची स्वत:ची उन्नती तर होईलच त्याच बरोबरीने त्यांच्या योगदानाने कुटुंबाची आणि पर्यायाने समाजाचीही प्रगती होण्यास मदत होईल.

❖❖❖

*(ब्लॉगर तसेच अनेक सेवाभावी सामाजिक संस्थांमध्ये कार्यरत.)*

(E-mail : amrutaprasada@gmail.com)

# आरक्षण : वास्तव आणि गैरसमज

■ मधुकर वारभुवन

गेली कित्येक वर्षे भारतीय संघराज्यातील राखीव जागांचे तत्त्व अर्थात आरक्षण या विषयावर विविध पातळ्यांवर चर्चा सुरू असून उपोषणे, मोर्चे, धरणे, परिषदा, घेराव व रास्तारोको अशा अनेक प्रकारची आंदोलने महाराष्ट्र आणि इतर राज्यांत होताना आपण पाहिली आहेत आणि पाहत आहोत. आरक्षण या विषयावर राज्यातील आणि देशातील अनेक मंडळी आपापली मते मांडताना दिसत आहेत आणि यातील काही मते समाजात अशांतता निर्माण करीत असल्याचे अलीकडील काही घटनांवरून आपण अनुभवत आहोत. आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावर बोलणाऱ्यांचा किती अभ्यास आहे? हे अनेकांच्या विधानांवरून लक्षात येते. आरक्षण म्हणजे काय? आरक्षणाचा उद्देश आणि आरक्षणासंबंधी संविधानातील तरतूद यांचे ज्ञान नसलेली मंडळी बिनधास्त आरक्षणाबाबत बोलत असून एक प्रकारे संविधानाचा अवमान करीत असल्याचे दिसून येत आहे. अशी विधाने करणाऱ्यांचे यामागे हेतू काय आहेत हे आपणास माहीत नाही. मात्र ते आरक्षण धोरणाच्या संविधानातील उद्देश आणि तरतुदींना फाटा देत बोलत आहेत, वागत आहेत असे दिसते.

आरक्षणाबाबत एक वेळ निरक्षर, अर्धशिक्षित किंवा स्वयंघोषित विचारवंत असलेल्या मंडळींचे आपण समजून घेऊ मात्र शिकली-सवरलेली, स्वत:ला उच्च विद्याविभूषित, ज्ञानी (?), विद्वान समजणारी (?) व खरोखरच असलेली मंडळीदेखील याबाबत संदर्भहीन व अतिशय भावनिक पातळीवर चर्चा करते तेव्हा एक संविधानवादी शिक्षक, कार्यकर्ता व कायद्याचा विद्यार्थी या नात्याने व्यक्त होणे हे माझे कर्तव्य समजतो म्हणून हा शब्दप्रपंच. सदर चर्चा ही केवळ शैक्षणिक क्षेत्रातील व नोकरीतील आरक्षणाची आहे, राजकीय आरक्षणाची नाही हे प्रथम लक्षात घ्यावे.

### ऐतिहासिक पार्श्वभूमी

क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी घेतलेली शूद्रातिशूद्रांच्या व महिलांच्या शिक्षणाची भूमिका, राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या जन्मदिनी राखीव जागांची केलेली तरतूद, सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदांमधून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आग्रह करीत केलेली मागणी, १९३२चा जातीय निवाडा व विभक्त मतदारसंघाला म. गांधींनी केलेला विरोध व त्यातून घडून आलेला पुणे करार आणि शेवटी भारतीय संविधान निर्मिती वेळीच्या विविध चर्चा या सर्वांचा परिणाम म्हणजेच भारतीय संविधानातील राखीव जागांची तरतूद होय.

### धर्म व जातीव्यवस्थेतून असमानतेचा उगम

भारतीय समाजात धर्म आणि जातीव्यवस्थेने समानता हे तत्त्वच नाकारलेले असल्याने भारतीय संविधानाच्या समानता या मुख्य तत्त्वाला अनुसरून सर्वांना समान संधी, प्रतिनिधित्व आणि सक्षमीकरण करणे यासाठी संविधानातील अनुच्छेद १५(४) आणि १६(४) मध्ये केवळ सामाजिक व शैक्षणिक मागासांसाठी उपाययोजना करण्याची म्हणजेच राखीव जागांची तरतूद करण्यात आलेली आहे. आर्थिकदृष्ट्या मागासांना नाही हे सर्वात महत्त्वाचे.

### अनु.जाती-जमातीचे आरक्षण जातीवर आधारित आहे का?

विशेषत: अस्पृश्य, आदिवासी (अनु. जाती-जमाती) करिता सांविधानिक आरक्षण असून ते त्यांच्या जातींना वर्षानुवर्षे उत्पन्नाची

साधने, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील अधिकार व मानवीय अधिकार इ. पासून वंचित उपेक्षित व सामाजिक न्यायापासून शेकडोमैल दूर ठेवण्यात आलेल्या जात समूहासाठी (प्रवर्गासाठी) आहे. कोणत्याही एका जातीसाठी नाही जरी ते जातीवर आधारित असले तरी हे सर्वांनी समजून घेणे आवश्यक आहे.

**ओबीसी अर्थात (एस.ई.बी.सी.) आरक्षण**

वर उल्लेखित अनुच्छेद १६(४) नुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासांना इतरांच्या बरोबरीने आणण्यासाठी विशेष तरतूद करण्याची मुभा कायदे मंडळाला देण्यात आली असून अनुच्छेद ३४० अन्वये मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार १९९१ नंतर हे आरक्षण लागू झाले. तेदेखील जातप्रवर्ग म्हणूनच आणि फक्त सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणावरच आर्थिक मागासलेपणावर नाही.

आरक्षण हा 'गरिबी हटाव' कार्यक्रम नसून प्रतिनिधित्व आणि समान संधी यासाठीची तरतूद आहे. हा खरा आरक्षण धोरणाचा मुख्य हेतू आहे.

कोणाला कोणत्या प्रवर्गात समाविष्ट करायचे हा संपूर्ण निर्णय व प्रक्रिया संघराज्य शासनाच्या हातात असून फक्त संविधानातील तरतुदी व केंद्र शासनाची इच्छाशक्ती यानुसार तसे करता येते. कुणाच्या मागणी वा आंदोलनामुळे नाही.

**१०६वी घटना दुरुस्ती व फक्त आर्थिकदृष्ट्या मागासवर्गासाठी आरक्षण**

संविधानात मागासांच्या उत्थानासाठी कायदे मंडळ व कार्यकारी मंडळाने सकारात्मक उपाययोजना कराव्यात असे राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वात स्पष्ट केलेले आहे आणि त्यानुसार कोणाचीदेखील मागणी नसताना भारतीय संसदेने १०६व्या संविधान दुरुस्तीने २०१९ मध्ये आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) १०% आरक्षण दिले आहे. हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. याचा फायदा 'अनुसूचित जाती-जमाती' व 'ओबीसीं'ना घेता येत नाही. कोणताही संख्यात्मक डाटा उपलब्ध नसताना हे १०% आरक्षण फक्त खुल्या प्रवर्गातील घटकांनाच लागू करण्यात आलेले आहे.

**आरक्षणामुळे गुणवत्ता ढासळते?**

काही विद्वानांच्या (?) या तर्कहीन प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच आहे. ते आपण समजून घेऊयात

अ) अनु. जाती-जमातीच्या उमेदवारांना केवळ त्यांच्याच प्रवर्गात स्पर्धा करून जे काही गुण मिळतात. त्यावरून फक्त त्यांच्याच प्रवर्गातील गुणवत्ता यादी ठरते. जी फक्त त्यांच्याच प्रवर्गातील उमेदवारांमधूनच जाहीर केली जाते. उदा. १०० जागांमधून अनुसूचित जाती १३% (फक्त १३) व अनुसूचित जमाती ७% (७) उमेदवार नोकरी किंवा एखाद्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशासाठी निवडले जातात. खुल्या गटातील उमेदवाराला ९५% असूनही प्रवेश मिळत नाही व मागासांना ४०% प्रवेश मिळतो हा दावा खोटा प्रचार असून प्रवेश किंवा निवड ही त्या त्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीवर अवलंबून असते. खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीत खुल्यागटातील उमेदवारांचा समावेश होतो.

गंमत म्हणजे जे राखीव प्रवर्गातील उमेदवार खुल्या गटातील उमेदवारा एवढीच गुणवत्ता धारण करतात त्यांना खुल्या गटातील उमेदवार म्हणून विचारात घेतले जाते.

ब) एकदा का प्रवेश आरक्षणातून मिळाला की खुल्या गटातील उमेदवार आणि राखीव प्रवर्गातील उमेदवार यांना शिक्षणात सारखाच अभ्यासक्रम, परीक्षा, प्रात्यक्षिक असते तर नोकरीतील उमेदवारांनाही सारखीच सेवा बजावावी लागते मग गुणवत्ता कमी-अधिक असण्याचा प्रश्न येतो कुठून?

वास्तव आणि विपर्यास या दोन्हींचा विचार करता आरक्षण विषयाबाबत वास्तव न समजून घेता जाणीवपूर्वक विपर्यास करून समाजात आरक्षण धोरणाबाबत अर्थात पर्यायाने संविधानाबाबत अपप्रचार केला जात आहे ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. याचा सर्वांनीच विचार केला पाहिजे. संविधान व आरक्षण धोरणाचा अधिक चांगला अभ्यास केला पाहिजे तरच संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्याला अर्थ आहे, असे मला वाटते.

❖❖❖

*(नवी मुंबई महापालिकेत शिक्षक, कायद्याचे अभ्यासक, कवी, लेखक व गायक.)*

(E-mail : madhukarjwarbhuwan@gmail.com)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचा विचार

■ आशा गायकवाड

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांची समता, सन्मान व समाज व्यवस्थेत होणाऱ्या शोषणातून मुक्तता होण्यासाठी अथक प्रयत्न केले. दलित स्त्रियांना दिली जाणारी हीन वागणूक पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्वस्थ होत. त्यांची तळमळ व हे सर्व बदलण्याची कळकळ व त्यातून होणारा उद्रेक खूप काही सांगून जातो. बाबासाहेबांनी कृतीवर भर दिला. दलित महिलांना घराबाहेर काढले. चळवळीत सामावून घेतले. छोट्या छोट्या बदलातून समानतेचा विचार रुजवला. स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्री पुरुष समानता, जात, धर्म, वर्ग, लिंग या पलीकडे जाऊन माणूस म्हणून समान वागणूक मिळणे म्हणजेच स्त्रीमुक्ती आहे. पण आज ही समान वागणूक मिळतेय का? बाबासाहेबांना अभिप्रेत स्त्रीमुक्ती दलित समाजात झिरपली आहे का?

दलित महिलांना प्रतिष्ठेनं जगता यावं यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हयातभर संघर्ष केला. महिला सक्षम झाल्या पाहिजेत हा त्यांचा ध्यास असे. समाज हा सामाजिक न्यायावर आधारित हवा. स्त्रियांना पुरुषांइतकाच समान दर्जा व समान शिक्षण मिळाले पाहिजे, असे बाबासाहेब सांगत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्ती विचारांचे समर्थक होते. महात्मा फुलेंनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा त्यांच्यावर प्रभाव होता. बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत असे बाबासाहेब म्हणत.

बाबासाहेबांनी १९४७ मध्ये कायदे मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. विवाह जमताना व विवाहोत्तरही स्त्री व पुरुषांचे संबंध हे समानतेवर आधारलेले हवेत. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. स्त्रियांचा विकास झाला तरच समाज विकसित होईल. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलामध्ये स्त्रियांच्या हक्कासंदर्भात अनेक गोष्टींची मांडणी केली. बहुपत्नीत्वाला कायद्यानुसार पायबंद घातला. त्यामुळे हिंदू कोड बिलाला मंजुरी मिळण्यात अडचणीचा डोंगर उभा राहिला. खाण व कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्रीला पुरुषांइतकीच मजुरी मिळाली पाहिजे असा आग्रह धरला. कष्टकरी स्त्रियांना २१ दिवसांची किरकोळ रजा व एक महिन्याची हक्काची रजा, अपघात किंवा काही दुखापत झाली तर नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे असे त्यांनी सांगितले. २० वर्षे नोकरी झाली असेल तर स्त्रियांना निवृत्तिवेतन दिले पाहिजे. बाबासाहेब ही जगातली पहिली व्यक्ती आहे की ज्यांनी स्त्रियांना प्रसूती रजा मिळाली पाहिजे यासाठी कायद्यात तरतूद केली.

हिंदू कोड बिल हे जातीव्यवस्था व पुरुषप्रधानतेला नाकारणारे व स्त्रीमुक्तीचा पुरस्कार करणारे आहे. जे हक्क व अधिकार पुरुषांना मिळतात ते स्त्रियांनाही मिळाले पाहिजेत हा समानतेचा विचार बाबासाहेबांनी मांडला. पुरुषांना जसा घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे तसा स्त्रियांनाही पुरुषापासून फारकत घेण्याचा अधिकार आहे. घर, शेत वा तत्सम मालमत्ता पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही वारसा हक्काने समान मिळाली पाहिजे. सासर व माहेरच्या मालमत्तेत तिचा समान अधिकार आहे. पण दुर्दैवाने आज सासर व माहेरच्या मालमत्तेत वारसा हक्कानं वाटा मिळणाऱ्या स्त्रियांचं प्रमाण एक टक्काही नाही.

स्त्री जातीच्या हक्कांसाठी बाबासाहेबांनी रान उठवले. स्त्री मुक्तीचा लढा व जातीअंताचा लढा या दोन्ही पातळ्यांवर एकाच वेळी त्यांनी काम सुरू केले. 'हिंदू कोड बिल' या कायद्यामुळे स्त्रियांना प्रतिष्ठा व सन्मान अभिप्रेत होता. घटस्फोट व वारसा हक्क स्त्रियांना मिळणे अपेक्षित होतेच. पण त्याचबरोबर तिला पोटगी मिळाली पाहिजे. मूल दत्तक घेण्याचा अधिकार असला पाहिजे. नवऱ्याने दुसरे लग्न केले तर न्यायालयात जाऊन पोटगी, मुलांचा ताबा किंवा दुसऱ्या लग्नाला आव्हान या गोष्टी बाबासाहेबांनी घटनेत केलेल्या तरतुदीमुळेच आज स्त्रियांना करणे शक्य झाले आहे. भारतीय संविधानातील हिंदू कोड बिलामध्ये नमूद केलेल्या समता, समानता व कायदेशीर हक्क यामुळेच स्त्री आज सुरक्षित जीवन जगत आहे. समाजात सन्मानाने वावरत आहे. उच्च व नीच जात, गरीब व श्रीमंत हा जातीय व वर्गीय भेदातून स्त्रियांची मुक्तता झाली पाहिजे. शिक्षणामुळे मुली बिघडतात हा विचार दूर सारून पालकांनी मुलांइतकेच मुलींनाही शिकवले पाहिजे असे ते सातत्याने सांगत असत. ब्राह्मणाच्या मुली शिकतील

तितक्या दलित मुलीही शिकल्या पाहिजेत या तळमळीतूनच औरंगाबादला त्यांनी महाविद्यालय सुरू करून मुलींना प्रवेश द्यायचा आग्रह धरला. दलित स्त्री शिक्षित नसल्यानेच लग्न व बाळंतपण तिच्यावर लादली जातात असे म्हणत १९४२ला बाबासाहेबांनी महिला परिषद आयोजित केली होती. लग्न व मुले यांच्या निवडीचा अधिकार स्त्रियांना असला पाहिजे. स्त्री एक व्यक्ती आहे व्यक्ती म्हणून तिला स्वातंत्र्य असलेच पाहिजे. पत्नी ही नवऱ्याची सखी व समान अधिकार असलेली गृहिणी असली पाहिजे. गुलाम नव्हे असे बाबासाहेबांनी सांगितले.

प्रगती, विकास, अर्थार्जन, स्वावलंबन, आवडीनिवडी व इच्छांना प्राधान्य, निर्णयस्वातंत्र्य, दलित स्त्रियांना घेता आलं पाहिजे व शिक्षणानंच ते तिला मिळेल असा स्त्रीमुक्तीचा विचार ते सतत सांगत. १९३२ साली सावंतवाडीला केलेल्या भाषणात त्यांनी स्पर्श व अस्पर्श ही स्त्रियांमधील दरी मिटली पाहिजे. त्यासाठी आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत असे प्रतिपादन केले होते. दलित स्त्रियांनीही दलितेतर स्त्रियासारखे साडी नेसण्याची पद्धत अवलंबली पाहिजे असेही सांगितले. बाबासाहेबांवर गाढ विश्वास असलेल्या स्त्रियांनी त्यांचा मार्ग अवलंबिला. देव्हाऱ्यातील देव पाण्यात बुडवले. व्रतवैकल्ये सोडली, शिक्षणाचा वसा घेतला.

आज आपण एकविसाव्या शतकात आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत स्त्रीमुक्ती दलित स्त्रियांपर्यंत झिरपली आहे का? आजूबाजूची परिस्थिती नाही असेच सांगत आहे. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या दलित महिला विद्यापीठं, महाविद्यालयं, बँका, डॉक्टर, सरकारी कचेऱ्यामधून दिसतात. बाकीच्या कष्टकरी महिला आज तेच कष्टाचं जिणं जगत आहेत. कचरावेचक महिला या महार, मांग, बंजारी, आदिवासी समाजातीलच आहेत. आजही दलितेतरांनी टाकलेल्या घाणीत हात घालून ती कचरा वेगळा करतेय व उदरनिर्वाह करतेय. 'जय भीम' व 'माझा भीमराव'ची गाणी म्हणतेय. मातंग समाजातील माझी भगिनी अण्णा भाऊ साठेंना पूजतेय. कचऱ्यातलं जिणं जगतेय. एकटी दलितेतर स्त्री या कचरा वेचण्याच्या व्यवसायात शोधूनही तुम्हाला सापडणार नाही. २०२१ साली आजही ती अंगठा उठवतेय. वस्तीत मुली सुरक्षित नाहीत म्हणून चौदाव्या वर्षी लग्न करतेय. व्यसनाच्या अधीन गेलेल्या मुलांकडे हतबल होऊन पाहतेय. त्यांना सांभाळतेय. संशय घेणारा, दारू पिणारा, काहीही काम न करणाऱ्या नवऱ्याचा मार खातेय. इच्छा असूनही या नवऱ्यापासून तिची सुटकाच होत नाहीय. स्त्रीमुक्तीचा अर्थ कळलेल्या दलित व दलितेतर स्त्रिया त्यांच्या हस्तिदंती मनोऱ्यात बसून वैचारिक मांडणी करतायेत. विद्यापीठीय आकडेवारी सांगताहेत. दहा घरी जाऊन उष्टी खरकटी भांडी घासणारी, घरातला कचरा काढून फरशी पुसणारी महिला ही दलित, मातंग, चांभार, आदिवासी समाजातलीच आहे. मराठा, ब्राह्मण, जैन तत्सम कार्यात हिंदू समाजातील एकही महिला या कामात नाही. बाबासाहेबांना अभिप्रेत स्त्रीमुक्ती यांच्या वाट्याला आली आहे का? तर त्याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. शेतावर, गवंड्यांच्या हाताखाली, सफाई खात्यात काम करणाऱ्या भगिनीही याच वर्गवारीतील आहेत. या साऱ्याजणी दिवसभर कष्ट करतात. आलेल्या पैशातून जेमतेम घर चालवतात. आजारपण, लग्न यासाठी कर्ज काढतात व परत दुप्पट वेगानं कपट करत कर्ज व व्याज फेडत राहतात. बाबासाहेबानी मांडलेली स्त्रीमुक्ती शिक्षित दलित महिलांपर्यंतच पोहोचली आहे व मध्यमवर्गीय दलित तर महिलेलाच आकळली आहे. स्त्रीमुक्तीची चळवळ ही मध्यमवर्गीय शिक्षित, विद्यापीठीय मांडणी करणाऱ्या महिलांच्या भारदस्त प्रबंधातच बंदिस्त आहे. शिक्षित दलित स्त्रिया या दलित ब्राह्मण झाल्या आहेत. कारण ह्या हुबेहूब तस्स जगत आहेत. हाय टेन्शनखाली. गटारीच्या कडेला, अंधाराच्या साम्राजात राहणाऱ्या या कष्टकरी महिलेच्या झोपडीतलं जग स्त्रीमुक्ती चळवळीतील विद्याविभूषित दलित व दलितेतर किती महिलांनी पाहिलंय ही आकडेवारी काढायची ठरवली तर ती फारच विदारक व भयावह असेल.

पण मग माझा भीमराव म्हणणाऱ्या यांना डॉ. बाबासाहेबांनी काय दिले. झोपडपट्टीतील या महिलांच्या झोपडीत तुम्हाला देव दिसणार नाही. बाबासाहेबांचा फोटो मात्र आहे. त्या शिकल्या नाहीत. पण परिस्थितीनं कणखर झाल्या. मुलीनं शिकावं म्हणून धडपडताहेत. बचत गटातून कर्ज घेऊन सावकाराच्या जाळ्यातून बाहेर पडल्या आहेत. दारुड्या नवऱ्याला घराबाहेरचा किंवा पोलीस स्टेशनचा रस्ता दाखविण्याची हिंमत आली आहे.

समारोपाकडे येताना बाबासाहेबांची स्त्रीमुक्ती चळवळ नवीन पिढीतील दलित व दलितेतर स्त्रिया पुढे नेताना दिसत नाहीत. दलित समाजातच आज झोपडीत राहणारी गरीब, कष्टकरी महिला व फ्लॅटमध्ये स्थिरावलेली उच्चशिक्षित महिला असे दोन गट पडले आहेत. ही उच्चशिक्षित स्त्री आंबेडकर चळवळीत दिसत नाही, पण मग बाबासाहेबांच्या विचाराचे काय होतेय. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या परिवर्तनवादी चळवळीतील शिक्षित मध्यमवर्गीय जिणे जगणाऱ्या काही स्त्रिया प्रामाणिकपणे काम करत आहेत. पण त्यांचे प्रयत्न खूपच अपुरे व तोटके आहेत. त्यांचे कामही विखुरलेले आहे. दलित चळवळीतील महिला व दलितेतर चळवळीतील महिला यांची फारकतच आहे. त्या त्यांच्या पद्धतीने वेगवेगळे काम करतात. एकमेकींच्या जगात फिरकत नाहीत.

त्यामुळे काम एकसंध होत नाही. स्त्रीमुक्तीचा विचार कृतीत येण्यासाठी प्रथम जातीची उतरंड नष्ट झाली पाहिजे. पण त्यापेक्षाही वर्गभेद कमी झाला पाहिजे. गरीब व श्रीमंत प्रचंड भेद आहे व श्रीमंतांना हा भेद स्वीकाहार्य आहे. गरिबांनी गरीबच राहावे. घरकाम, बागकाम, स्वयंपाक, बाजारहाट, मुलं सांभाळणं, घराचं व्यवस्थापन हे सगळं करावं. श्रीमंतांनी या सेवा घेत आरोग्य, शिक्षण, मुलांची लग्नं यासाठी आर्थिक मदत करावी व समाजकार्य केल्याच्या भावनेनं कृतकृत्यं व्हावं. सर्व गरीब हे दलितच आहेत व सर्व श्रीमंत हे दलितेतर व काही दलित आहेत.

बाबासाहेबांनी महिलांसाठी अनेक परिषदा घेतल्या. महिला लांबून लांबून मोठ्या संख्येनं या परिषदांना हजर राहात. बाबासाहेबांचा शब्द प्रमाण मानून कृतीत आणत. मोडक्या-तोडक्या भाषेत आपले विचार मांडत या महिला मोर्चे काढू लागल्या. चळवळीत उतरू लागल्या. स्त्रियांचे हक्क मिळविण्यासाठी स्त्रियाच पुढे आल्या पाहिजेत हा विचार बाबासाहेबांनी मांडला व तो स्त्रियांच्यात झिरपला हे नक्की.

आज बाबासाहेबांच्या स्त्रीमुक्तीच्या विचाराचा परत एकदा जागर मांडला पाहिजे. वस्तीवस्तीमधून बाबासाहेबांचा विचार झिरपला पाहिजे. कृतीत आला पाहिजे. वस्तीत अंधश्रद्धा, दारिद्र्य, व्यसन, शिक्षण यावर विशेषत: तरुणाईवर काम करण्याची गरज आहे. राजकारण्यांनी मतासाठी, स्वयंसेवी संस्थांनी प्रकल्पांसाठी व सरकारने कागदी घोडे नाचविणाऱ्या योजनाच्या घोषणांसाठी काम करणे थांबवले व खऱ्या अर्थाने वर्ग व वर्ण व्यवस्थेतील अंतर कमी करण्यासाठी मध्यमवर्गीय, पांढरपेशा उतरवून तळमळीने दलित, कष्टकरी, भगिनीला हात दिला तर बाबासाहेबांचा स्त्री मुक्तीचा विचार कृतीत येणे अवघड नाही.

❖❖❖

*(सामाजिक कार्यकर्ती, कचरा वेचक महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत.)*

(E-mail : asha.gaikwad 11@gmail.com)

## ज्येष्ठ लेखक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. आनंद करंदीकर यांना अन्नपूर्णा परिवारातर्फे आदरांजली !



# कस्तुरबा गांधी एक समर्पित जीवन

■ वृषाली मगदूम

कस्तुरबा गांधी यांची कायमच एक धाडसी, झुंजार स्त्री अशी स्वतंत्र ओळख होती. ती ओळख कधीही केवळ महापुरुषाची पत्नी म्हणून झाकोळली गेली नाही. लहानगी कस्तुरबा वयाच्या अगदी तेराव्या वर्षापासून अनेक गोष्टी पाहत आली, शिकत आली, चाचपडतही राहिली, संघर्षाची मशाल घेऊन उभी ठाकली, कधी संघर्ष रास्त होता, कधी नव्हता, अनुभवातून, परिस्थितीतून जीवन मूल्यं शिकताना तावूनसुलाखून निघाली. पण डगमगली नाही, महात्मा गांधींना प्रश्न विचारायला, विचार प्रवृत्त करायला व स्वीकार करायला लावणारी ती सहचारिणी होती. महात्मा गांधींनी कस्तुरबाविषयी लिहिले आहे, 'माझी पत्नी ही अहिंसा शास्त्रातील माझी गुरू बनली.' कस्तुरबा लहानपणी सरळ स्वभावाच्या, स्वतंत्र बाण्याच्या व मेहनती होत्या. कस्तुरबा व महात्मा गांधी यांचा बालविवाह होता, महात्मा गांधी तेराव्या वर्षी फक्त मोहनदास होते, आजूबाजूच्या पारंपरिक गोष्टींचा पगडा होता, आजूबाजूला इतर पुरुष वागतात तसेच आपण वागायचे आहे अशी समाजसुधारणा होती. त्यामुळे घरातील स्त्रिया घरातील पुरुषांची परवानगी घेतल्याशिवाय बाहेर जात नाही हे गांधींना माहीत होते. कस्तुरबाने आपली परवानगी घेऊनच बाहेर जावे असे मोहनदासला वाटत असे. पण छोटी कस्तुरबा मंदिरात जात असे, मैत्रिणीकडे जात असे, पण तिने मोहनदासला विचारून गेले पाहिजे याचे कधीही दडपण घेतले नाही, बाहेर पडायची मोकळीक स्वतंत्रपणे घेतली. ह्यावरून कस्तुरबा व मोहनदास यांच्यात वादही होत, पण आपल्या ठाम विचाराने कस्तुरबाने बाल मोहनदासच्या मनातील स्वामित्वाची भावना काढून टाकली. समता व समानतेचा विचार कोणी शिकवावा लागत नाही, तो उपजतच कस्तुरबामध्ये होता, पण तो काळ फार वेगळा होता, घर, कुटुंब, समाजात स्त्रियांनी घरात राहणे, शिक्षण न घेणे चालीरीती पाळणे, यापलीकडे स्त्रियांना जग नव्हतं, महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेत गेले, तिथे त्यांनी लोकांचे असंख्य प्रश्न सोडवले. दक्षिण आफ्रिकेतून भारतात येण्याचा त्यांनी निर्णय घेतला, निरोप समारंभात त्यांना अनेक मौल्यवान वस्तू भेट म्हणून मिळाल्या. त्यात कस्तुरबा नाही एक हार मिळाला होता. समाजसेवकाने खासगी भेटी स्वीकारू नयेत या विचाराचे महात्मा गांधी होते, महात्मा गांधींनाही या भेटी नाकारण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला, एक रात्रभर महात्मा गांधी आपल्या खोलीमध्ये ऐरझाऱ्या घालत विचार करत होते व शेवटी या आसक्तीमधून ते बाहेर आले, मी हे सर्व घेतले तर मी समाजाची जी सेवा केली त्याचा मोबदला घेतला असं होईल, असं वाटून गांधींनी मुलांना व कस्तुरबाला या सर्व वस्तू परत करण्याचा विचार सांगितला, गांधींच्या प्रभावाखाली मुले तयार झाली, पण संसारी बाना भविष्यकालीन किंवा आपत्तीकालीन तरतूद असावी असं वाटत होते, पण गांधी आपल्या विचारावर ठाम होते, त्यांनी एक ट्रस्ट बनवून त्या सर्व गोष्टी सार्वजनिक कामासाठी दिल्या, कस्तुरबांनी गांधीशी वाद घातला, या वस्तूवर त्यांचाही तितकाच अधिकार असल्याचे सांगितले, पण महात्मा गांधी आपल्या मताशी ठाम राहिले, हे सगळे समजून घ्यायला, विचार रुजायला कस्तुरबांना वेळ लागला, या ठिकाणी महात्मा गांधींनी स्वत:च्या मूल्यांमध्ये तडजोड केली नाही, पण स्त्री ही स्वत:पुरता विचार करत नाही, किंबहुना स्वत:चा विचार करत नाही, कुटुंबातील व्यक्ती, घर, इतर व्यवस्थापन, भविष्यकालीन तरतूद अशा अनेक गोष्टी यांचा विचार करते, गांधींच्या एकंदर स्वभावाचा अंदाज असणाऱ्या कस्तुरबाला भेटीत आलेल्या या वस्तू ठेवणे आवश्यक वाटणे स्वाभाविक आहे, त्यासाठी त्यांनी वाद घातला, आपल्या भूमिकेचे समर्थन केले, महात्मा गांधींच्या सवयी ज्या विचित्र वाटू शकतात या सवयी स्वत:मध्ये भिनवणे हे सामान्य माणसासाठी खूप अवघड व जाचक आहे. पण कस्तुरबाला असामान्यच म्हणावे लागेल, अतिशय धीराने, शांतपणे त्यांनी महात्मा गांधींच्या अनेक सवयी अंगी बाणवल्या. स्वत:च्या मूल्यांना व तत्त्वांना चिकटून राहणे हे गांधींसाठी सोपे होते, कारण ते त्यांच्यात उपजतच होते, पण कस्तुरबांसाठी ते खूपच अवघड होते, पण कस्तुरबांनी देशासाठी व पतीसाठी जो त्याग केला तो त्यामुळे जास्त महत्त्वाचा आहे, गांधीजींनी स्त्री शक्तीचा, स्त्री स्वभावाचे आकलन कस्तुरबांच्या माध्यमातून झाल्याचे लिहिले आहे. साध्या, सरळ, मध्यमवर्गीय घरात वाढलेल्या, घराबाहेरचे जग फारसे माहीत नसणाऱ्या, शिक्षणाने भान न आलेल्या कस्तुरबांनी देशासाठी

व पतीसाठी खूप त्याग केला. आजही भारतीय स्त्रीमध्ये पती सांगेल ते ऐकणे, त्याचा मान राखणे, त्याच्या निर्णयाचा आदर करणे व त्याचे निर्णय आवडले नाहीत, हिरमोड झाला, मनाविरुद्ध गोष्टी घडल्या तरी पतीच्या विचाराचा आदर करत त्याला सहमती देणे, हे पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत दिसून येते. स्त्रियांच्या मनात ते आतवर झिरपलेले आहे. घर बांधून ठेवण्याचे अवघड काम आजही स्त्रिया करत आहेत. कस्तुरबाचा काळ तसा खूपच जुना म्हणजे सव्वाशे वर्षांपूर्वीचा आहे. त्यात एका महापुरुषाची पत्नी म्हणून त्यांच्या वर्तनावर फक्त कुटुंबच नाही तर समाजाचीही बारीक नजर होती याची त्यांना जाणीवही नसेल, सावित्रीबाईंना जोतिबांनी शिकवले, घडवले, सावित्रीबाई झरझर शिकल्या, घडल्या, जोतिबांचा वसा पुढे चालू ठेवला, सावित्रीबाई जोतिबांची सावली न राहता एक स्वतंत्र्य व्यक्तिमत्त्व झाली, कस्तुरबाही महापुरुषांच्या सावलीत दबल्या नाहीत, स्वतंत्र विचार घेऊन पुढे जात कृती करत राहिल्या, स्त्री म्हणून असलेली सहनशीलता, ममत्व, धाक अशा अनेक गोष्टी त्यांच्यात होत्या, त्यामुळे इथे घडवणाऱ्यांपेक्षा घडणाऱ्याचे योगदान महत्त्वाचे आहे. आपली मूल्यं, तत्त्वनिष्ठा, वैश्विक विचार घेऊन समाज बदलण्यासाठी समाजातील रूढी परंपरांना धक्के देण्यासाठी जेव्हा समाजसुधारक काम करतात तेव्हा त्यांच्या सहचारिणीची साथ व सहभाग असल्याची उदाहरणे खूप नगण्य आहेत, महापुरुषांच्या सहचारिणीने निखारा हातात घेतलेला असतो. जोडीदाराची समाज बदलण्याची मशाल धगधगती ठेवायची असते, त्याच्याबरोबर वाटचाल करत स्वत:ची फरफट होऊ द्यायची नसते, महात्मा गांधींनी देशाला स्वातंत्र्याचे स्वप्न दाखवले, सत्यात उतरविण्यासाठी कठोर संघर्ष, बंड केले, कस्तुरबा त्या स्वप्नांचा एक अविभाज्य भाग होत्या, कस्तुरबांनी दक्षिण आफ्रिकेत स्वत: राजकारणात उडी घेतली. भारतीय स्थलांतरितावरील गैरवर्तनाविरुद्धच्या निदर्शनामध्ये भाग घेतला, कस्तुरबाला अटक झाली, शिक्षा सुनावली गेली, पण तुरुंगातही त्यांनी महिलांना मार्गदर्शन केले, महिलांना लिहायला-वाचायला शिकवले, शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. १९०४ मध्ये फिनिक्स वसाहत स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली व त्या वसाहतीत समाजकार्यही केले, दक्षिण आफ्रिकेतून परत आल्यानंतर कस्तुरबांनी अनेक आंदोलनात व निदर्शनांमध्ये भाग घेतला होता. गांधी तुरुंगात असताना आश्रमाचे सर्व व्यवस्थापन कस्तुरबांकडे होते, त्यांना बा म्हणून संबोधले जाई. महात्मा गांधी स्वत:च्या मुलांकडे दुर्लक्ष करतात असं कस्तुरबांना नेहमी वाटत असे. पण याबाबत त्यांनी गांधींना कधी विचारले नाही व मुलांना पाठीशी घातले नाही. १९१७ मध्ये कस्तुरबा गांधींच्या बरोबर बिहारमध्ये गेल्या, महात्मा गांधी निळ उत्पादक शेतकऱ्यांबरोबर काम करत होते, गांधींनी तिथे मोठे आंदोलन उभे केले, तेव्हा कस्तुरबांनी महिलांना स्वच्छता, शिस्त, आरोग्य याचे धडे दिले, वाचन लेखन शिकवून साक्षर केले, १९२२मध्ये गुजरातमधील बोरसाड येथील सत्याग्रह चळवळीत भाग घेतला, सविनय कायदेभंग मोहिमा व मोर्चामध्ये कस्तुरबा नेहमी भाग घेत असत, अनेक वेळा त्यांना अटकही झाली. तुरुंगवास भोगावा लागला, १९३९ मध्ये राजकोटमध्ये ब्रिटिश राजवटीविरुद्ध अहिंसक मार्गाने कस्तुरबांनी निदर्शने केली, त्यांना अटक झाली व एकांतवासात ठेवून त्यांच्यावर पहारा ठेवण्यात आला, कस्तुरबांना दम्याचा विकार होता, त्यांची तब्येत बिघडली होती, तरीही त्यांनी १९४२ च्या ब्रिटिशांच्या विरुद्धच्या भारत छोडो चळवळीत भाग घेतला, त्यांना अटक झाली व आगाखान पॅलेसमध्ये त्या नजरकैदेत होत्या, प्रकृती अतिशय बिघडलेली होती. कस्तुरबाविषयी लिहिताना गांधींनी लिहिले आहे, बा खूप हट्टी होती ती माझ्या दबावाला कधीही बळी पडली नाही, त्यांना योग्य वाटेल तेच त्या करायच्या, माझे सार्वजनिक जीवन विस्तारत गेले तसे कस्तुरबांनीही त्या कामात स्वत:ला झोकून दिले. कस्तुरबांना गंभीर दमा होता त्यातून त्यांना न्यूमोनिया झाला, महात्मा गांधी तुरुंगात असताना त्यांनी उपोषण केले व आजार अधिक बळावला, १९४४ मध्ये त्यांना हृदयविकाराचा झटका आला, श्वास घेण्यास त्रास होऊ लागला, मूत्रपिंडही निकामी झाले, त्या आयुर्वेदिक उपचार घेत असत, २२ फेब्रुवारी १९४४ला संध्याकाळी ७-३५ मिनिटांनी आगाखान पॅलेसमध्ये कैदेत असतानाच वयाच्या ७४व्या वर्षी त्यांचे निधन झाले, कस्तुरबांच्या निधनानंतर कस्तुरबा गांधी स्मारक न्यास निधीची स्थापना करण्यात आली आहे, हा निधी भारतातील खेड्यातील महिला व मुलांना मदत करण्यासाठी वापरण्यात येतो, ११ एप्रिल हा कस्तुरबांचा जन्मदिवस, हा दिवस राष्ट्रीय सुरक्षित मातृत्व दिन म्हणून साजरा केला जातो, कस्तुरबांच्या वर अनेक चरित्रात्मक पुस्तके लिहिली गेली आहेत, शाळा, रस्ते, हॉस्पिटल अशा अनेक ठिकाणी कस्तुरबांचे नाव देण्यात आले आहे. नारायण देसाई यांनी कस्तुरबा हे नाटक लिहिले आहे, कस्तुरबा गांधींचा पोस्टल स्टॅम्प आहे, १९६४ मध्ये भारत सरकारने हा स्टॅम्प बनवला आहे, अरुण गांधी यांनी २००० साली लिहिलेले 'कस्तुरबा एक जीवन' हे पुस्तक कस्तुरबांच्या खडतर, प्रामाणिक, एकनिष्ठ, समर्पित जीवनावर प्रकाश टाकते, कस्तुरबांविषयी बोलत असताना कस्तुरबांची चार मुले, आश्रम, कौटुंबिक, सामाजिक जीवन, राजकीय चळवळीतील सहभाग हे सर्व महत्त्वाचे आहेच, पण महात्मा गांधींच्या बरोबर व्यतीत होणारे समांतर आयुष्य हे प्राधान्यक्रमाने जास्त महत्त्वाचे आहे, महात्मा गांधींचे अहिंसेचे व सत्याचे प्रयोग सामान्य माणसासाठी अचंबित करणारे व सामान्य माणसाला अघोरी वाटणारे होते, महात्मा गांधींनी उपोषण करणे, प्रकृती खालावणे, मृत्यूचे दाराशी

असतानाही दूध, औषधाला नकार देणे हे कस्तुरबांसाठी एक सहचरी म्हणून किती क्लेशकारक असेल हा विचारही आपण करू शकत नाही, पण कस्तुरबा धाडसी होत्या, त्यांनी स्वत:ला कधीही विचलित होऊ दिले नाही, धैर्य गमावले नाही, दुग्ध व्यवसायातील लोक गायी, म्हशीबरोबर क्रूर वागतात म्हणून गांधींनी दूध न घेण्याची प्रतिज्ञा केली होती, अविचल गांधींनी काही ठरवले की माघार नाही, गांधींनी दूध घेतले तरच तब्येतीत सुधारणा होईल असे डॉक्टरांचे म्हणणे होते, कस्तुरबांनी तोडगा काढला, गांधींना शेळीचे दूध दिले, ममत्व व धाडस, संकटावर मात करण्याची ऊर्जा, कस्तुरबा गांधींना मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढू शकल्या. अरुण गांधींनी 'कस्तुरबा एक जीवन' या पुस्तकात कस्तुरबा या महात्मा गांधींच्या फक्त अनुयायी नव्हत्या तर त्यांची गांधींच्या जीवनातील भूमिका दृढ, निश्चयी, खडतर व समर्पित जीवनावर प्रकाश टाकते. कस्तुरबांच्या जीवनातील अनेक पैलू उलगडताना त्यांचे व्यक्तिमत्त्व व स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान यावरही विस्ताराने लिहिले आहे, अरुण गांधींनी अतिशय अभ्यासपूर्वक, संशोधन करून, दोघांच्या जीवनातील ऐतिहासिक घटनांचे सत्य वर्णन केले आहे, हे चरित्र दोन व्यक्तींची शक्तिशाली कथा असून दोघांनी प्रतिकूल परिस्थितीवर केलेली मात आहे, अरुण गांधी हे कस्तुरबांचा मुलगा मणिलाल गांधी यांचा पाचवा पुत्र होय, त्यांनी लिहिले आहे कस्तुरबांच्या अखंड सहकार्याशिवाय आजोबा त्यांची आध्यात्मिक उंची गाठू शकले नसते. कस्तुरबा महात्मा गांधींच्या कृतीला प्रतिकार करायच्या, पण जर मनापासून ती कृती पटली तरच तिचा स्वीकार करायच्या, गांधींचा या कृतीमागील पुढील विचार काय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करायच्या. गांधींनी स्वत:वर व इतरांवर अनेक कठोर, काही वेळा क्रूर वाटतील अशी बंधनं लादून घेतली होती, कस्तुरबा अतिशय आजारी होत्या. डॉक्टरांनी जगण्याची आशा सोडली होती, अशा वेळी त्यांनी मटण सूप खाल्ले तरच त्या जगतील असे डॉक्टरांनी सांगितले होते, ज्याला महात्मा गांधी व स्वत: कस्तुरबा यांची संमती नव्हती, त्यामुळे अशा या अवस्थेतसुद्धा महात्मा गांधी त्यांना डॉक्टरांच्या घरून घेऊन गेले, रेल्वे प्लॅटफॉर्मवर दुबळ्या अशा त्या चालल्या, घरी आल्यानंतरही मीठ व कडधान्य खाऊ नये असा गांधींनी आग्रह धरला जो त्यांनी मानला नाही म्हणून गांधींनीच वर्षभर मीठ व कडधान्ये सोडण्याची प्रतिज्ञा केली, कस्तुरबांनी मग मीठ व कडधान्य सोडले, मरता मरता त्या वाचल्या, पण मग या घटनेची खंत त्यांनी कधी व्यक्त केली नाही, एखाद्या गोष्टीला प्रतिकार केला तरी नाकारलेपण किंवा अपराधीपणा कधी त्यांच्या वृत्तीत नव्हता. कस्तुरबांचे आगाखान पॅलेसमध्ये निधन झाले, तिथे त्यांची समाधी आहे, विनोबा भावे एक तीर्थक्षेत्र असा त्याचा उल्लेख केला आहे, भारतातील व इतर प्रदेशांतील अनेक जाणकार अभ्यासक, गांधी विचारावर श्रद्धा असणारे लोक इथे आवर्जून भेट देतात.

महात्मा गांधी व कस्तुरबा यांचे जीवन एकमेकाला पूरक व प्रेरक होते. कस्तुरबा गांधींपासून अनेक गोष्टी शिकल्या तसे गांधीही कस्तुरबांपासून खूप काही शिकले याची कबुली त्यांनी दिली आहे, कस्तुरबावर महात्मा गांधींच्या विचारांचा खूप प्रभाव होता, पण त्यांनी अंधानुकरण कधीच केले नाही, पटणाऱ्या अनेक गोष्टींचे अनुकरण केले, गांधींच्या प्रमाणे स्वत:चे जीवन साधे बनवले, राजकीय सामाजिक कामात झोकून दिले, स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली, तुरुंगवास भोगला, गांधी आश्रमात नसताना आश्रमाची देखभाल केली, देशासाठी त्यांनी केलेला त्याग व बलिदान अतिशय महत्त्वाचे आहे, महात्मा गांधींनी कस्तुरबाविषयी जे लिहिले आहे ते वाचताना कस्तुरबांच्या महान व्यक्तिमत्त्वाचे आपणाला आकलन होते, गांधी म्हणतात, 'पुरुषाने स्त्री वर्गाची पायमल्ली केली आहे ते मी जाणतो नव्हे मी स्वत:च माझ्या पत्नीशी एकेकाळी सुलतानाप्रमाणे वागत होतो आणि मी स्वत:ला स्त्रियांचा कैवारी समजतो म्हणून माझ्याशी यथेच्छ भांडण्याचा व मला विरोध करण्याचा स्त्रियांचा हक्क मी मान्य केला आहे, मी जेव्हा माझ्या इच्छेप्रमाणे माझ्या पत्नीला वाकवण्याचा प्रयत्न केला तेव्हा मी तिच्याकडून आयुष्याचा धडा शिकलो, एका बाजूला ती माझ्या इच्छेला निकराने विरोध करीत होती तर दुसऱ्या बाजूला माझ्या मूर्खपणामुळे होणाऱ्या कष्टांना निमूटपणे मान तुकवत होती. ही तिची वृत्ती पाहून अखेरीस माझीच मला लाज वाटली, तिच्यावर स्वामित्व गाजवण्यासाठीच मी जन्माला आलो आहे या विचारांच्या मूर्खपणातून मी मुक्त झालो आणि सरतेशेवटी माझी पत्नी ही अहिंसाशास्त्रातील माझी गुरू बनली, कस्तुरबा गांधींसाठी पत्नी, आई, समीक्षक व मैत्रीणही होती.

❖❖❖

*(१४ पुस्तकांच्या लेखिका, स्त्री चळवळीतील कार्यकर्त्या, स्त्री मुक्ती संघटना, अन्नपूर्णा परिवार, अन्वय प्रतिष्ठान या संस्थांत विश्वस्त म्हणून कार्यरत.)*

(E-mail : vamagdum@gmail.com)

# महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद

१९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष व नंतर महिला दशक जाहीर केले. २०२५ मध्ये या घोषणेला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ५० वर्षांत स्त्रियांच्या जीवनातील परिवर्तनाचा लेखाजोखा घ्यावा म्हणून १९७५ पासून स्वायत्त स्त्रीमुक्ती चळवळ संघटित करण्यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद हे व्यासपीठ निर्माण केले आहे. देशाचा स्वातंत्र्यलढा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन, हैद्राबाद मुक्ती संग्राम, हिंदू कोड बिलाच्या समर्थनार्थ झालेल्या चळवळीमध्ये देशातील स्त्रियांनी दिलेला सहभाग हा आमचा समृद्ध वारसा आहे. व्यासपीठाच्या वतीने वर्षभर काही उपक्रम करावयाचे योजले आहे. त्याची सांगता दि. २०, २१, २२ डिसेंबरला मुंबई येथे महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेने होणार आहे. त्या वेळी पुढील दिशा ठरावरूपाने जाहीर केली जाईल.

महात्मा फुले यांनी १८४८ साली सावित्रीबाईंच्या मदतीने स्त्रियांची पहिली शाळा सुरू केली. या शाळेमध्ये जाती-धर्माचा भेदाभेद न करता स्त्रियांना प्रवेश होता. असेच प्रयत्न भारतभर सुरू झाले. २५ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले आणि ब्राह्मणी पितृसत्तेला विरोध केला. गेल्या ५० वर्षांमध्ये स्त्रियांच्या जीवनात अनेक महत्त्वाचे बदल झाले. 'स्त्रीमुक्ती संघर्ष परिषद' पुणे येथे २८ ऑक्टोबर १९७५ला झाली. देशभर स्त्रीमुक्ती चळवळीचे भगिनीभाव सुदृढ करणारे जाळे तयार होऊ लागले. स्त्रियांनीच कौटुंबिक हिंसाचार तसेच एकूणच जागतिक हिंसाचाराचे स्वरूप याची मांडणी स्त्रीवादी दृष्टीकोनातून केली. हुंडा, लैंगिक अत्याचार व छळ इत्यादी हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी कायदे, स्त्रियांच्या संरक्षणासाठी विविध उपक्रम यासाठी सरकारबरोबर संघर्ष आणि सहकार अशा भूमिका घेऊन खूप मोठी वाटचाल केली आहे. सर्व प्रकारचे वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, मानसिक आणि सांस्कृतिक संघर्ष करत एकूणच पितृसत्ताक संरचनेशी करावा लागणारा सामना अधोरेखित केला. या सगळ्याची चर्चा या निमित्ताने महाराष्ट्रभर सुरू झालेली आहे.

स्त्रीमुक्ती चळवळ नेहमीच असे मानते की, सगळ्या वंचित विभागांना व समूहांना सामाजिक न्याय, सन्मानाने जगण्याचा हक्क आणि समन्यायी जीवन जगता आले पाहिजे. आपल्या लैंगिकता ओळखून सन्मानाने जगू इच्छिणाऱ्या सर्व ओळखींना आपल्यासोबत एकत्र घेऊन स्त्रीमुक्ती चळवळ पुढे जात आहे. स्त्रियांसह अन्य दलित, आदिवासी, लैंगिक ओळखी असलेल्या व्यक्ती व समूह LGBTQIA+ (क्वीअर, ट्रान्स), अपंग व्यक्ती असे आम्ही सर्व स्त्रीवादी चळवळीचे एकत्रित घटक आहोत. आमचा संघर्ष व्यापक आहे. त्यासाठी आजच्या स्त्रीवादी आंदोलनात आम्ही एकत्र आहोत. मानवमुक्तीच्या दिशेनी जाण्यासाठीचा आमचा प्रवास आहे.

धर्म विद्वेषाचे राजकारण, जातिभेदांची नवीन रूपे, वर्ग आणि वर्णवर्चस्वाची भावना समाजात फूट पाडते. हिंदुत्वाच्या नावाने द्वेष पसरवणारी वक्तव्ये करून सामाजिक सलोखा नष्ट केला आहे. याची गंभीर दखल स्त्रियांची चळवळ घेत आली आहे. सध्या जगात धर्म आणि आक्रमक राष्ट्रवादाच्या विकृत संकल्पनेतून पॅलेस्टाइनमध्ये भयावह असा क्रूर नरसंहार सुरू आहे. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या नरसंहाराने आम्ही दु:खी आहोत. आम्ही पॅलेस्टिनी जनतेच्या सोबत आहोत. सद्य:परिस्थिती, मधली जागतिक वाढता फॅसिझम, उजव्या प्रवृत्तींचे सत्ताग्रहण, क्रोनी कॅपिटालीझम यांचा सामना सर्वांनाच करावा लागणार आहे. आम्ही या चळवळीचा भाग आहोत. आपण विविध देश, वेश, भाषा, प्रांत, धर्म, जीवनशैली, संस्कृती आणि सभ्यता विकसित करणारे लोक सामंजस्य, प्रेम, सहकार यांच्या साहाय्याने हिंसामुक्त जीवन जगू शकतो, असा आमचा दृढ विश्वास आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून काम सुरू झाले असून कार्यकर्ते संघटित होत आहेत. त्यांत गाव, तालुके, जिल्हे उत्साहाने सहभागी होत आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा, अहमदनगर, नाशिक, पुणे, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ अशा सर्व ठिकाणी, सेफ्टी ऑडिट, 'मनुस्मृती नको संविधान हवे' यासारख्या जनजागृती मोहिमा, विविध विषयांवर भूमिका मांडणाऱ्या पुस्तिका आदी तयारी सुरू झाली आहे. परिषद तर भव्य होईलच पण विभागीय तसेच स्थानिक कार्यक्रम होणार आहेत. समाजातील सर्व स्तरांपर्यंत व थरांपर्यंत पोहोचण्याचा आमचा निर्धार आहे.

तरच पुढच्या ५० वर्षांत आपण आपल्या ध्येयाच्या जवळ जाऊ शकू, असा आम्हाला विश्वास वाटतो.

**उद्दिष्टे -**

वर्ग, वर्ण व जातिभेदविरहित समाज घडविणे.

धर्मनिरपेक्ष समाजाची बांधणी करणे.

सामंजस्य, सलोखा आणि सहकार्य यावर लोकशाही भारत घडविणे.

**मार्ग -**

जनजागृती व लोकसहभाग वाढविणे. लोकहितविरोधी धोरणे, कायदे आणि उपक्रम यांच्या विरुद्धचा आवाज संघटित करणे. समाजाच्या स्त्रीवादी परिवर्तनासाठी विविध उपक्रम करणे व राज्य सरकार, तसेच केंद्र सरकारकडे मागण्या करणे त्याचबरोबर सरकारच्या स्त्रीहितविरोधी व समाजहितविरोधी धोरणांचा प्रतिकार करणे.

**महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेच्या विशिष्ट मोहिमा -**

१) ३६ जिल्ह्यांमधून सार्वजनिक सुरक्षिततेची पाहणी - सेफ्टी ऑडिट.

२) मनुस्मृती नको, संविधान हवे यासाठी कार्यशाळा घेणे. दादर, सिंधुदुर्ग, चिपळूण येथे कार्यशाळा झाल्या.

३) १० मुख्य विषयांवर पुस्तिका काढणे जसे स्त्रियांवरील हिंसाचार, कायदे बदल, अर्थव्यवस्था, शेतकरी महिलांचे प्रश्न, शिक्षण

४) पोस्टर प्रदर्शने, पोस्टर्स अन्य कलामाध्यमांचा उपयोग करणे.

५) सहभागींना अभिव्यक्तीसाठी व्यासपीठ उपलब्ध करणे.

**मागण्या -**

१) आदिवासी, दलित, भटके विमुक्त व अल्पसंख्याक समूहातील तसेच सर्व स्त्रिया आणि क्वीअर ट्रान्स लोकांवरील अत्याचारविरोधी कायद्यांची समीक्षा करून योग्य सुधारणा करून त्वरित अंमलबजावणी करा. मुस्लीम समुदायांवर होणारी आर्थिक, धार्मिक, हिंसक आक्रमणे रोखण्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर आहे. त्यांच्यावर होणारे हल्ले तात्काळ थांबवण्यासाठी, समाजात द्वेषपूर्ण वक्तव्य करून सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्यांवर सरकारने कारवाई करावी.

२) आर्थिक विषमता वाढत नेणारी धोरणे बंद करा. स्त्रिया आणि परालिंगी (ट्रान्स) लोकांसाठी सुरक्षित रोजगार निर्मिती, संघटित तसेच असंघटित क्षेत्रातील सर्व कामगारांना समान कामाला समान वेतन आणि कायद्याप्रमाणे व महागाई निर्देशांकाप्रमाणे किमान वेतन द्यावे. आरोग्य, शिक्षण व परिवहन वाहतूक व्यवस्थेतील खासगीकरण थांबवून सार्वजनिक व्यवस्थांवरील अतिक्रमण थांबवावे. पर्यावरणीय संकल्पना केंद्रस्थानी ठेवून विकासाची धोरणे आखावीत.

३) महाराष्ट्र शासनाने मागील विधानसभा अधिवेशनात जनसुरक्षा विधेयक मांडले आहे. या विधेयकाद्वारे समाज परिवर्तनाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर निर्बंध आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रातील लोकशाहीवादी पक्ष संघटनांनी या विधेयकाला विरोध केला आहे. जनतेच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध आणणारे हे विधेयक संमत करू नये.

४) अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरील हल्ले ताबडतोब थांबवा. कायदा हातात घेऊन समाजात दहशत आणि द्वेष निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करा. हिंसाचारी व द्वेषमूलक प्रचारावर बंदी घाला.

५) कामगार हिताचे कायदे अमलात आणा. कामगारांना असुरक्षित जीवन जगायला लावणारे कायदे बरखास्त करा. ईएसआयसी कायद्यात सुधारणा करून कामगारस्नेही कायदे करा. योजना कर्मचारी जसे अंगणवाडी कर्मचारी, आशा सेविका, माध्यान्ह भोजन कर्मचारी इत्यादींना शासकीय सेवेचा दर्जा देऊन वेतनश्रेणी द्यावी.

Our bank :

Account Name - Marashtra Stree Mukti Parishad

Saraswat Co-Operative Bank Ltd.

Branch Dadasaheb Phalke Road,

Dadar (E), Mumbai - 400014

Account No. : 610000000053758

IFSC CODE : SRCB0000004

पैसे UPI (GPAY, Phonepay) / Net banking वापरून बँकेत भरावे व पैसे भरल्याचा मेसेज छाया दातार यांच्या मोबाइल नं. ९३२२५ ९७९९७ वर पाठवावा.

❖❖❖

(E-mail : streevadiparishad@msmporg.in)

# सिंहावलोकन आणि पुढील दिशा

■ डॉ. मेधा पुरव सामंत

'अन्नपूर्णा परिवारा'च्या आजवरच्या वाटचालीकडे मी वळून पाहते तेव्हा मी आणि अन्नपूर्णा परिवार एकमेकांत दूध-साखरेसारखे मिसळून गेलोय असं वाटतं. 'अन्नपूर्णा' ही माझी ओळख, अस्तित्व, ध्यास-श्वास बनली आहे. मी बँक सोडून अन्नपूर्णा परिवार घडवला नसता तर मी काय केलं असतं याची कल्पनासुद्धा करता येत नाही. पण मी बँक ऑफ इंडियामधल्या माझ्या १२ वर्षांच्या कारकिर्दीबद्दल ऋणी आहे. कारण तिथे बँकिंग क्षेत्राचं गमभन गिरवलं ते अन्नपूर्णा परिवाराची आर्थिक घडी भक्कम करण्यासाठी खूप उपयोगी ठरलं. बँकांकडून गरीब महिलांना वाटण्यासाठी कर्जाऊ पैसे मिळवणं मुळीच सोपं नव्हतं; पण बँकर्सची विचार करण्याची पद्धत ठाऊक असल्यामुळे मी कर्जासाठी प्रस्ताव लिहिण्यापासून बँकांच्या व्याजाच्या दरात घासाघीस करण्यापर्यंतची कामं करत आले. गेली १० वर्षं मी माझ्या तरुण सहकाऱ्यांना हे तंत्र शिकवून तयार करत आहे.

हे लिहीत असताना प्रत्यक्ष हिशोब केला, तर आजवर माझ्या वैयक्तिक जामिनावर मी अंदाजे ३००० कोटी रुपये एवढी रक्कम गरीब महिलांपर्यंत विनातारण पोहोचवली आहे, आणि त्यांनी त्याची चोख परतफेडही केली आहे. बँकांनी कायम बाजारभावानेच आम्हाला पैसे दिले. मला चीडही येते आणि गंमत वाटते, की काही श्रीमंत उद्योगपती बँकांकडून कमीत कमी व्याजदराने हजारो कोटींचं कर्ज मिळवतात आणि ते बुडवून पसार होतात; पण त्यांच्यावरच बँकांचा भरवसा ! का? तर त्यांच्याकडे स्थावर मालमत्ता असते. गरीब कष्टकरी महिलांवर त्यांचा विश्वास नसतो, कारण त्यांची झोपडीसुद्धा स्वतःच्या मालकीची नसते. बँकांचा सगळा विश्वास तारण व जामीन यांवरच. म्हणजे ज्यांच्याकडे तारण, जामीन नाही ते कधीच पुढे जाऊ शकणार नाहीत. अजूनही ही मानसिकता बँकांनी बदललेली नाही.

मी आमच्या बँकर्सना म्हणत आले आहे, 'तुम्ही ५० कोटींच्या कर्जाला मला वैयक्तिक जामीन द्यायला लावता, पण वेळ आली तर मी एकटी कुठे भरू शकणार आहे ५० कोटी रुपये ? पैसे भरताहेत माझ्या गरीब सभासद महिलाच पण तुमचा भरवसा अजूनही त्यांच्यावर नाहीच!

अन्नपूर्णा परिवाराच्या या खटाटोपातून गरिबात गरीब महिलांच्या नावावर घरं, यंत्रं, मालमत्ता वाढली. त्यांच्या आरोग्याचा दर्जा सुधारला. आर्थिक साक्षरता वाढली. महिला धीटपणे बोलू लागल्या. घरात, वस्तीत, गटांच्या बैठकांत, प्रतिनिधी सभांमध्ये विचार मांडू लागल्या. निर्णय घेऊ लागल्या. महिलांचं हे सक्षमीकरण टप्प्याटप्प्याने घडत गेलं.

मी सर्वच संकटांतून संधी शोधत गेले. अनघड रस्ते चालले, नवे रस्ते निर्माण केले. २०१०नंतर लघुवित्त क्षेत्राची वाट अनघड राहिलेली नाही, अवघड झालेली आहे. खूप धंदेवाईक मायक्रो फायनान्स कंपन्या, बँका या क्षेत्रात उतरल्या आहेत. परंतु त्यामुळे खूप स्पर्धा वाढली आहे व गरजेपेक्षा, क्षमतेपेक्षा अधिक कर्ज घेण्याची प्रवृत्ती गरीब कुटुंबांमध्ये वाढत आहे. एका बाजूला नफेखोरीसाठी धंदा करणाऱ्या महाकाय मायक्रो फायनान्स कंपन्या अणि दुसऱ्या बाजूला आर्थिक गरजेपेक्षा मिळतं आहे तर घ्या, अशा भावनेतून अनेक कर्जं एकाच वेळी घेणाऱ्या महिला, त्यांना पुढे करून कर्ज घेणारे व न फेडणारे त्यांच्या घरातील पुरुष यांच्याकडे पाहून वाटतं, की एक दिवस महाराष्ट्रातही आंध्र प्रदेशसारखं आर्थिक अरिष्ट येऊ शकतं. या विचाराने मला चिंता वाटते.

अन्नपूर्णा परिवारच्या लघुविम्यासारखा कानाकोपऱ्यातल्या खेड्यांपर्यंत पोचावा अशी माझी फार इच्छा आहे. अनेक छोट्या छोट्या सेवाभावी संस्था हा लघुविमा कार्यक्रम कुठेही राबवू शकतील; पण अजून तरी त्याचा आम्हाला फार प्रसार करता आलेला नाही.

लघुविमा क्षेत्र भारतात अजूनही सर्वदूर पसरलेलं नाही. कारण इन्शुरन्स रेग्युलेटरी ॲन्ड डेव्हलपमेंट ॲथॉरिटी, हेल्थ मिनिस्ट्री यांनी लघुविमा क्षेत्रात अजूनही निश्चित धोरणं आखलेली नाहीत. लघुवित्त व लघुविमा दोन्ही क्षेत्रांसाठी देशव्यापी कायदा आजही अस्तित्वात नाही. असंघटित क्षेत्रातील आर्थिक सेवासुद्धा असंघटितच आहेत याची खंत वाटते. त्या पातळीवर मला काहीच काम करता आलेलं नाही.

तसंच विमा क्षेत्रात नफ्यासाठी काम करणाऱ्या मोठमोठ्या विमासंस्थांनाच आयआरडीए सांगतं, की तुम्हीच गरिबांना लघुविमा सेवा द्या. पण या कंपन्या गरिबांना परवडेल असा व त्यांच्या

गरजांवर आधारित विमा मुळीच देत नाहीत. शिवाय दावे नाकारण्यावरच त्यांचा भर असतो. 'आयुष्मान भारत'सारखी गाजावाजा केलेली देशव्यापी सरकारी योजना असो की खासगी विमा कंपन्यांची योजना, त्यांचा भर हृदयविकार, गुंतागुंतीचे आजार यासाठी दावे देण्यावर असतो. पण आजही आपल्या देशातील गरीब घरांमध्ये टीबी, कावीळ, मलेरियाने मृत्यू होतात. त्याच्या भरपाईसाठी त्यांच्याकडे काहीच आर्थिक पाठबळ नसतं. आम्ही २०-२२ वर्षे गरिबांसाठी गरिबांच्या गरजांवर आधारित, त्यांना परवडेल अशी विमा योजना तयार करून चालवून दाखवली आहे. तरीही आयआरडीए म्हणतं, 'शंभर कोटी 'सॉल्वन्सी कॅपिटल' भरा, मग आम्ही तुम्हाला मान्यता देऊ.' आम्ही संवाद, मांडणी इत्यादी माध्यमांतून त्यांना हे सांगत आहोत, की आम्हाला परवडेल असं कमी 'सॉल्वन्सी कॅपिटल' घ्या, म्हणजे आम्ही पण तुमची मान्यताप्राप्त विमाकंपनी होऊ. असं झालं, तर आमच्या पायावर पाय ठेवून इतर संस्थासमूह तयार होतील आणि लघुविमा भारतभर पसरेल. भारतातील कोट्यवधी गरीब जनतेला विम्याची खरीखुरी कवचकुंडलं मिळतील.

२०२०पर्यंत आयआरडीएने लघुविम्यासाठीचं 'सॉल्वन्सी कॅपिटल' वीस कोटीपर्यंत खाली आणलं. आमचा आग्रह पाच कोटींचा आहे. ते अजून झालेलं नाही. झालं तर छान, अन्यथा आम्हाला वीस कोटी रुपये उभे करावे लागतील. सध्या लघुविम्याचा कायदा होण्याचीही आम्हाला प्रतीक्षा आहे.

देशव्यापी फक्त गरीब कुटुंबांसोबत काम करू शकणाऱ्या लघुविमा कंपनीची स्थापना करण्याचा विचारही मनात आहे. १९८० पासून २००० पर्यंत नाबार्ड मॉडेल (बचत गटांना बँकांच्या कर्जयोजनेशी जोडणं) बऱ्यापैकी स्थिरावलं होतं. त्यातून ग्रामीण भागातल्या महिलांना गटाच्या जोरावर विनातारण कर्ज मिळण्याचं साधनही उभं राहिलं होतं. परंतु सरकारी यंत्रणांमध्ये लाल फितीचा शिरकाव कधी होतो ते कळतही नाही. अशाच प्रकारे बचत गटांना रिझर्वेशनखाली सबसिडी मिळण्याच्या योजनांशी जोडलं गेलं. त्यानंतर बचत गटांमध्ये सबसिडी मिळणार असेल तरच महिलांचा सहभाग होऊ लागला. हळूहळू नाबार्डप्रणित बचत गट मॉडेल मंदावताना दिसून आलं.

याच कालखंडात सिडबीने मायक्रो फायनान्स करणाऱ्या अनेक संस्थांना सीड कॅपिटल व कर्जाऊ रक्कम देऊन बळकट केलं. यामध्ये ट्रस्ट, बचत गट फेडरेशन, सहकारी वित्तसंस्था अशा सर्वांचा समावेश होता. या काळात लघुवित्त संस्थांचा बराच विकास झाला. साधारण २०००च्या नंतर रिझर्व बँकेने मायक्रो फायनान्ससाठी 'नॉन- बँक फायनान्स कॉर्पोरेशन' हे नवीन प्रारूप निर्माण केलं. (त्याबद्दल आधी लिहिलं आहेच.)

आता तर रिझर्व बँकेने 'स्मॉल फायनान्स बँक' हे नवीन प्रारूप आणलं आहे. २०१६-१७ पासून १०-११ नॉन-बँक फायनान्स कॉर्पोरेशन या प्रारूपाखाली नोंदणीकृत झाल्या आहेत. यातून तर गरिबांना विनातारण कर्ज मिळण्याचा मार्ग बंदच होत जाताना दिसत आहे. एकंदर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची त्याबाबतची धोरणं अशी आहेत, की मोठ्या बँकांप्रमाणे स्मॉल फायनान्स बँकांनीसुद्धा ८५ टक्के तारणी कर्ज आणि फक्त १५ टक्के विनातारण कर्ज, असाच व्यवसाय करण्याची अपेक्षा धरली जाते. त्यामुळे ज्यांच्याकडे मालमत्ता नाही त्यांना कोणी वाली उरलेला नाही असं म्हणावं लागतं.

थोडक्यात, मायक्रो फायनान्स क्षेत्रामध्ये गेल्या पंचवीस वर्षांत पुष्कळ विस्तार झाला असला, तरी 'महिला सक्षमीकरणाचं साधन' ही या क्षेत्राची ओळख बदलून हे क्षेत्र नफा कमवण्यासाठी चांगलं आहे, अशी याची नवी ओळख बनली आहे.

मी १९९३मध्ये बँक सोडून महिलांना छोटी कर्ज देण्यास सुरुवात केली त्या वेळी महिलांचा आर्थिक विकास व त्यातून सामाजिक सक्षमीकरण हे ध्येय डोळ्यांसमोर होतं. परंतु गेल्या ३२ वर्षांचा अन्नपूर्णा परिवाराचा व माझा प्रवास या क्षेत्रात एक व्यावसायिक संस्था असा झाला आहे. तरीही एक नफेखोर, धंदेवाईक संस्था म्हणून आम्ही ओळखले जात नाही. याचं कारण आम्ही जपलेलं सामूहिक जबाबदारीचं आणि सहकाराचं वातावरण.

मायक्रो फायनान्स क्षेत्राची बदललेली मानसिकता, नफेखोरी, लघुविमा क्षेत्रातील कायद्यातल्या त्रुटी यामुळे या क्षेत्रात हात घालण्याची कोणाचीही तयारी नाही, असं आज एकंदर चित्र दिसतं. यामुळे मी निराश झाले आहे असं मात्र मुळीच नाही. लघुवित्त क्षेत्र पुन्हा एकदा महिला सक्षमीकरणाच्या दिशेने कसं वळवता येईल त्यावर मी शांतपणे, नीट विचार करणार आहे. याचबरोबर लघुविमा क्षेत्राचा विस्तार भारतभर कसा करता येईल याची आखणी करण्याचं माझं ध्येय आहे. यात किती यश येईल मला माहीत नाही, पण प्रयत्न सोडणार नाही.


❖❖❖

*(डॉ. मेधा पुरव सामंत ह्यांच्या 'आम्ही स्वयंपूर्णा' ह्या कार्यचरित्रातून.)*

(E-mail : cmd@annapurnapariwar.org)

समकालीन प्रकाशन

# अन्नपूर्णा परिवार आणि समकालीन प्रकाशन ने प्रकाशित केलेले





आम्ही स्वयंपूर्णा
चळवळीची पार्श्वभूमी लाभलेल्या डॉ. मेधा पुरव सामंत यांनी तीस वर्षांपूर्वी एका छोट्या खोलीतून 'अन्नपूर्णा परिवारा'ची सुरुवात केली. आज या परिवाराने पुण्या-मुंबईतल्या सव्वा लाख कष्टकरी महिलांना आपल्या कवेत घेतलं आहे. हा परिवार २०० कोटींहून जास्त उलाढाल करणारा सहा सामाजिक संस्थांचा समूह बनला आहे. 'अन्नपूर्णा'च्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या पायावर उभं करणारं, एवढंच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षितता पुरवणारं यशस्वी मॉडेल मेधाताईंनी उभं केलं आहे.
हे कसं घडलं? रोज भेटणाऱ्या भाजीवाल्या बायकांना सावकारी चक्रातून बाहेर काढण्यासाठी मेधाताईंनी स्वतःच्या खिशातून नऊ महिलांच्या गटाला पहिलं कर्ज दिलं. हा प्रयोग यशस्वी झाल्यावर कष्टकरी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी काम करायचं पक्कं करत मेधाताईंनी बँकेतली नोकरी सोडली आणि पूर्णवेळ कामात वाहून घेतलं. तीस वर्षं जीवाचं रान करत कल्पकता आणि धडाडीने संस्था वाढवली. महिलांच्या गरजा समजून घेत आरोग्यविमा, मुला-मुलींसाठी शिष्यवृत्ती आणि निवृत्तीनंतरच्या पेन्शनसारख्या अनेक योजना सुरू केल्या. अन्नपूर्णा परिवार हा एकखांबी तंबू होऊ नये यासाठी महिलांमधूनच नेतृत्वही घडवलं. महिलांनाच नव्हे, तर संस्थेलाही स्वतःच्या पायावर उभं केलं. या अफाट प्रवासाची गोष्ट सांगणारं एका सामाजिक उद्योजिकेचं प्रेरणादायी कार्यचरित्र.

हे पुस्तक खरेदीसाठी
प्रथितयश दुकानांमध्ये उपलब्ध आहे.
ऑनलाइन बुक गंगा या साइटवर
आणि अन्नपूर्णा परिवाराच्या
वेबसाईट वर उपलब्ध आहे.
https://annapurnapariwar.org/books

हेड ऑफिस पत्ता : सुवास्तु प्रेस्टीज, आर. एम. डी. इन्स्टिट्यूटच्या मागे,
आदित्य गार्डन सिटी शेजारी, मुंबई बेंगलोर हायवे, वारजे, पुणे - ४११०५८.

# ‘आम्ही स्वयंपूर्णा’ ह्या कार्यचरित्राच्या प्रकाशन सोहळयातील काही क्षणचित्रे!























# अन्नपूर्णा त्रैमासिक अहवाल

■ **अंजली पाटील**

अन्नपूर्णा परिवारातील माझ्या सहकारी मित्र मैत्रिणींनो...

मागील संवाद अंकात शेवटी शेवटी मी उल्लेख केला होता आपला ऑगस्ट संवाद अंक प्रकाशनाचा. विश्वस्त मंडळाच्या मीटिंगमध्ये वृषालीताई आणि प्राचीताई यांनी अंकाचे प्रकाशन केले. सर्वच विश्वस्त या वेळी उपस्थित होते.

हा अंक तुम्ही नक्की वाचला असेल. तुम्हाला तो आवडला का? खरे तर तुमच्या प्रतिक्रिया अपेक्षित असतात. त्या द्यायला तुम्ही शिकले पाहिजे म्हणजे लिखाण कसे हवे याचीही दखल घेतली जाते.

ऑगस्टमध्ये महत्त्वाचा कार्यक्रम होता मेधाताईंचे कार्य चरित्र, 'आम्ही स्वयंपूर्णा' ह्या पुस्तक प्रकाशनाचा. समकालीन प्रकाशनतर्फे पुस्तकाचे प्रकाशन होते. आनंद अवधानी, गौरी कानिटकर यांनी गेले वर्षभर मेधाताईंच्या लिखाणाचा पाठपुरावा घेतला होता. अनेक मुलाखती झाल्या, दुरुस्त्या झाल्या आणि २४ ऑगस्ट रोजी फिल्म आर्काइव्ह हॉलमध्ये पुस्तकाचे शानदार प्रकाशन झाले. अध्यक्षस्थानी कुमार केतकर ही पत्रकारितेमधील दिग्गज व्यक्ती लाभली होती. अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे, अभिनेत्री चिन्मयी सुमित उपस्थित होते.

प्रारंभापासूनच या कार्यक्रमात 'आपलेपणा'ची भावना जाणवत होती. सर्वांची भाषणे उत्तमच झाली.

गौरी कानेटकर यांनी, युनिक फीचर्सची वैचारिक भूमिका सांगताना, समकालीन प्रकाशन संस्थेच्या कामामागील चिकित्सक कार्यपद्धती आणि शिस्तीतून निर्माण झालेली अचूकता नेमकेपणाने विशद केली.

चिन्मयी सुमित यांनी पुस्तकातील एका प्रसंगाचे केलेले प्रभावी वाचन भावभावनांनी ओथंबलेले असल्याने, बहुतेकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. शेवंता मावशींना तो प्रसंग अगदी डोळ्यासमोर आल्याने त्यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली.

डॉ. अजित रानडे यांनी सोप्या शब्दात 'अन्नपूर्णा' परिवाराचे अर्थशास्त्र मांडताना, या मॉडेलचे महत्त्व आणि त्याविषयी समाजात चर्चा होण्याची गरजही प्रतिपादित केली.

कुमार केतकर यांनी नेहमीप्रमाणेच एक व्यापक सामाजिक व आर्थिक पट मांडताना, मागील ५० वर्षांत फुलून आलेल्या मध्यमवर्गीयांच्या मानसिकतेचाही अचूक वेध घेतला.

मेधाताईंनी भाषणामध्ये सद्य:परिस्थितीत शासन व्यवस्थेने स्वयंसेवी क्षेत्रासाठी जे अडथळे निर्माण केले आहेत, पावलोपावली खोडे घालून ठेवले आहेत, त्याचा वाईट अनुभव सार्वत्रिक असला, तरी त्याबाबत फारसे कोणी बोलताना दिसत नाही. त्याविषयी केलेले सूतोवाच फार महत्त्वाचे होते.

कार्यक्रमाला उपस्थित सर्वांनी मेधाताईंचे खूप अभिनंदन केले. या पुस्तकाच्या निमित्ताने मायक्रो फायनान्स संस्था चालवितानाचे चांगले अनुभव, कोणत्या परिस्थितीत ताईंनी ती उभी केली, सभासदांनी त्यांना कशी साथ दिली, त्यांच्या अनुभवांनी ताई कशा जगाच्या विद्यापीठात पीएच.डी घेऊन स्वत: अनुभवसंपन्न झाल्या, हे वाचताना आपल्याला खूप छान वाटेल. यानिमित्ताने एक चांगले पुस्तक वाचकांच्या हाती आले आहे.

ह्या निमित्ताने मेधाताईंच्या मुलाखतीही प्रसिद्ध झाल्या. ज्याचाही खूप उपयोग होईल. एक सामाजिक चळवळ प्रोफेशनली कशी उभी राहू शकते ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'अन्नपूर्णा परिवार'.

अन्नपूर्णा परिवारच्या मुकुटामध्ये पुरस्कारांचे मोरपीस पुन्हा जडवले गेले आहे. नवरात्रीमध्ये २२ सप्टेंबर रोजी मेधाताईंना 'लक्ष्मीमाता जीवनगौरव पुरस्कार' दिला गेला. हा कार्यक्रम गणेशकला क्रीडा हॉल इथे संपन्न झाला. अनेक दिग्गज व्यक्ती तिथे उपस्थित होत्या.

एक मानाचा पुरस्कारही मेधाताईंना नुकताच मिळाला आहे. अन्नपूर्णा महिला को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड ह्या आपल्या संस्थेला इलाबेन अवॉर्ड; 'बेस्ट विमेन फ्रेंडली इन्स्टिट्यूट २०२५' हा सा-धन ह्या मायक्रो फायनान्समध्ये काम करणाऱ्या संस्थेचा पुरस्कार प्राप्त झाला. हा कार्यक्रम १४ नोव्हेंबर २०२५ रोजी अशोक हॉटेल, नवी दिल्ली येथे पार पडला.

अन्नपूर्णा परिवार यांच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी
निशा साळगावकर - बोर्ड मेंबर,
रोहिणी देशपांडे - बोर्ड मेंबर,
कल्पना जाधव - अकाउंट्स मॅनेजर,
सारिका मारणे - फायनान्स मॅनेजर,

सारिका कांबळे आणि अख्तरी शेख - वस्ती प्रतिनिधी दिल्ली येथे गेले होते. खूप सुंदर सोहळा होता तो. देशभरातील अनेक फायनान्स करणाऱ्या कंपन्या, संस्था इथे उपस्थित होत्या.

तुम्हाला माहीत आहेच, अन्नपूर्णा वाशीचे जुने ऑफिस रिडेव्हलपमेंटला दिल्यामुळे नवीन ऑफिस वाशी रेल्वे स्टेशन वरती टॉवर नंबर ६ मध्ये स्थानापन्न होऊन चांगल्या पद्धतीने कामकाज सुरू झाले आहे.

अन्नपूर्णामध्ये सभासदांचे जे तक्रारीचे कॉल येतात किंवा डॉक्टरांना मेंबर्स आजारी पडल्यावर हॉस्पिटलमध्ये दाखला घेण्यासाठी जेव्हा फोन करतात ते सगळे फोन कॉल्स घेण्यासाठी एक ऑटोमॅटिक सिस्टीम आर्टिफिशल इंटेलिजन्सच्या माध्यमातून तयार करत आहोत. यामुळे सभासदांनी कोणत्याही वेळी फोन केला तरी तो या मशीनद्वारे अटेंड केला जाणार आहे. याचे प्राथमिक काम नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होईल.

अन्नपूर्णा को-ऑपरेटिव्ह बोर्डाच्या इलेक्शनसाठी दर ५ वर्षांनी निवडणूक होत असते. ऑगस्ट २०२३ला को-ऑपरेटिव्हचा कायदा बदलला व या बदललेल्या कायद्यानुसार को-ऑपरेटिव्ह डिपार्टमेंटने दिल्लीवरून अन्नपूर्णा क्रेडिट सोसायटीला दोन महिन्यांचा इलेक्शन प्रोग्राम दिला होता. हा इलेक्शन प्रोग्राम सप्टेंबर २५ ते नोव्हेंबर २५ पर्यंतचा होता. याचाच एक भाग म्हणून को-ऑपरेटिव्हच्या इलेक्शनसाठी उभे राहिलेले संचालक मंडळ आहे त्यातील सर्व जण १५ सप्टेंबरला पुण्यातील कलेक्टर ऑफिसच्या अंतर्गत असिस्टंट कमिशनर श्री. हौसारे यांना भेटून उमेदवारी अर्ज दाखल करून आले. त्यांच्यासमोर काही कागदपत्रांवर सह्या केल्या. आपल्या बोर्ड मेंबर्सची त्यांनी ओळख करून घेतली.

बोर्ड इलेक्शनबाबत पुढील टप्पा म्हणजे ३ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑफिस बेअरर म्हणजे पदाधिकारी पदाची निवडणूक पार पडली व यामध्ये पुण्याचे कलेक्टर श्री. जितेंद्र दुधी यांच्यासमोर चेअरपर्सन म्हणून डॉ. मेधाताई आणि व्हॉइस चेअरपर्सन म्हणून अंजलीताईंची एकमताने निवड झाली.

क्रेडिट ब्युरो मेंबरशिप भारतातील कर्ज देणाऱ्या सर्व बँका, स्मॉल बँक, सहकारी संस्था म्हणजे को-ऑपरेटिव्ह संस्था, एन.बी.एफ.सी., सेक्शन ८ कंपनी या सगळ्यांना एकच असावी यासाठी मेधाताई पी.एम.ओ ऑफिस म्हणजे पंतप्रधानांच्या ऑफिस मध्ये तसेच नीती आयोग, फायनान्स मिनिस्ट्री यांच्यासोबत पत्रव्यवहार करत आहेत.

क्रेडिट ब्युरो कामकाज सुरू होण्यासाठी आपण एक एन.बी.एफ.सी. विकत घेणार आहोत. ती विकत घेण्यापूर्वी अन्नपूर्णाच्या बाजूने ड्यू डिलिजन्स नावाचा रिपोर्ट तयार करून घेतला गेला. म्हणजे नवीन विकत घेणाऱ्या संस्थेचं आरोग्य चांगलं आहे ना, सर्व अर्थाने आर्थिक आणि कायदेशीर अशी काही पूर्तता बाकी नाही ना हे ही चेक केले.

हा रिपोर्ट ओके आल्यानंतर क्रेडिट सोसायटीने त्यांच्याबरोबर एक एम.ओ.यू. ९ सप्टेंबरला पूर्ण केला. त्यात जो बेसिक व्यवहार ठरला आहे त्याप्रमाणे प्राथमिक पहिल्या टप्प्याचे पैसे ट्रान्सफर केले आहेत.

एन.बी.एफ.सी.च्या बोर्डवरती अन्नपूर्णाचे तीन बोर्ड मेंबर घेणे बाबतची प्रोसिजर सुरू केली आहे. याबाबत आर.बी.आय.ला कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज दाखल केले आहेत.

त्यामुळे पुढील तीन-चार महिन्यांत कर्जासाठी आपण क्रेडिट ब्युरोची इन्क्वायरी क्रेडिट ब्युरो एजन्सीकडून पुन्हा एकदा करू शकू जी अत्यंत आवश्यक आहे.

पॅन इंडिया इन्शुरन्स ही नवीन विमा कंपनी आपण स्थापन करत आहोत. अन्नपूर्णा परिवारातील 'अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन' या संस्थेतून सर्व सभासदांना गेली २३ वर्षे विम्याचे संरक्षण मिळते आहे. त्यात आरोग्य निधी, वेतन भत्ता म्हणजे हॉस्पीवेज, कुटुंब व जीवन सुरक्षा निधी, मालमत्ता हानी अशा विम्याचे आर्थिक संरक्षण सभासदांना दिले जाते. शिवाय मेडिकल ऑफिसरचे मार्गदर्शन आणि संपर्कातील हॉस्पिटलमध्ये उपचार व त्यात सूट असे फायदेही दिले जात आहेत. ही सोय फक्त अन्नपूर्णा सभासदांना मिळू शकते.

परंतु भारतातील इतरही गरीब कुटुंबांना अशा विम्याचे संरक्षण मिळणे ही खूप मोठी गरज आहे. सध्या भारतात १०% पेक्षाही कमी कुटुंबांना विम्याचे संरक्षण मिळते आहे. उर्वरित कुटुंबे विम्याच्या संरक्षणाच्या बाहेरच आहेत.

या सगळ्याचा विचार करून आपल्या संस्थापिका व प्रमुख मेधाताईंनी भारतातील गरीब कुटुंबांसाठी विमा मिळावा म्हणून लघु विमा कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या कंपनीचे कामकाज करणे/पाहणे यासाठी वेगळी टीम नेमावी लागणार आहे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत.

ही कंपनी IRDA यांच्या नियंत्रणाखाली असेल. अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन म्हणजेच अन्नपूर्णाचे सभासद पुढील काळात ह्या नवीन कंपनीचे सभासद बनतील. इतर लहान-लहान

मायक्रोफायनान्स संस्था व त्यांचे सभासद पुढील काळात ह्या नवीन कंपनीचे सभासद बनतील. यासाठी १०० कोटींचे भांडवल उभे करावे लागणार आहे. यासाठी अन्नपूर्णा महिला क्रेडिट सोसायटी लिमिटेड प्रमुख भागधारक असणार आहेत. कंपनी स्थापनेसाठीची गुंतवणूक अन्नपूर्णा महिला क्रेडिट सोसायटीमधून करावी लागणार आहे.

वस्ती प्रतिनिधी मीटिंगमध्ये ७ नोव्हेंबर रोजी ह्याची माहिती सर्वांना देऊन ठराव पास केला गेला. ७ नोव्हेंबर २०२५च्या मासिक सभेत झालेल्या चर्चेतून सर्व प्रतिनिधी/स्मॉलर जनरल

बॉडीने मिळून अन्नपूर्णातील सभासदांना जसे विम्याचे संरक्षण मिळते आहे तसे भारतातील इतर गरीब कुटुंबे, जी विम्यापासून वंचित आहेत अशा घटकांना ते संरक्षण मिळावे असा निर्णय पास झाला. तुम्हां सर्वांना हे माहीत असावे म्हणून सविस्तर इथे दिले आहे. ह्या ३ महिन्यांत आपल्या पाळणाघरात खूप छान छान उपक्रम राबवले गेले. ऑगस्टमध्ये गणपती, दहीहंडी, ऑक्टोबरमध्ये दिवाळी पार्टी आणि नोव्हेंबरमध्ये बालदिन.

पाळणाघरामध्ये गणपती उत्सव छान साजरा केला. सजावट करून मुलांनी तयार केलेले गणपती बसवले. दहीहंडी हा कृष्ण जन्माचा सोहळा करण्यासाठी बालवीर तयार झाले. सर्व संचालिका ताईंनी मस्त तयारी केली होती. छोटे छोटे गोपाळ तयार होऊन दहीहंडी फोडली होती. त्यातून मस्त खाऊ मिळाल्याने मुले खूप खूश झाली.

दीपावली ही लाडू-चिवड्याचा मस्त फराळ सर्वच पाळणाघरात दिला होता. त्यावर सर्व बालकांनी छान ताव मारला.

त्यानंतर नोव्हेंबरमध्ये सर्वांच्या आवडीचे चाचा नेहरू यांच्या जन्मदिनी सर्व मुलांनी चाचा नेहरू यांच्या गोष्टी ऐकल्या. नेहरूंना गुलाब फूल आणि छोटी मुलं खूप प्रिय होती. ते लहान मुलांशी छान प्रेमाने गप्पा मारत असत. आपल्या पाळणाघरात चाचा नेहरू यांच्यावर तयार केलेली व्हिडीओ क्लिप मुलांना दाखवली गेली. १४ नोव्हेंबरचे महत्त्व ह्यातून त्यांना समजले.

मेधाताई मुलांसाठी छान छान गोष्टी तयार करून देतात. ऋचाताई त्यात चित्र भरते. आणि आवाज असतो अमृताताईचा. गोड आवाजात ती गोष्ट सांगते. त्यानुसार चित्र मुलांसमोर येतात. चित्ररूपात गोष्ट जास्त लक्षात राहते. अशा रीतीने आपल्या पाळणाघरात मुले समृद्ध होत जातात.

तुमच्या माहितीसाठी सांगते गेले तीन महिने कर्जाचे आकडे कसे आहेत. दिवाळी सण होता तरीही २००० हा आकडा आपण पार नाही केला. आम्हाला तरी हे आकडे पटत नाहीत. गरिबांना कर्ज हवी आहेत. छोटी छोटी का होईना हवीच आहेत. त्यांना गरजांसाठी कोण मदतीचा हात देणार आहे? त्यासोबत मिळणाऱ्या सोयीही त्यांना हव्या आहेत. आपण त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही आहोत का? कुठं काय रहाते आहे? ह्याचा तुम्ही नक्कीच विचार करावा असे वाटते.

हा अंक हातात येईल तोपर्यंत आपली ट्रिप होईल. त्यानंतर धावपळ सुरू होईल वार्षिक मीटिंगची. तारखा माहीत आहेत ना...

२४ जानेवारी...पुणे

३१ जानेवारी...वाशी.

ह्या वर्षीच्या मीटिंगसाठी सभागृह सभासदांनी ओसंडून भरून राहिले गेले पाहिजे. मेधाताई नवीन योजना त्यांच्यासाठी तयार करत असतात. त्यांच्या गरजा जाणून घेत असतात. ती माहिती स्वत: ऐकणे, अनुभवणे ह्यासाठी सभासदांनी वार्षिक मीटिंगला आवर्जून आलेच पाहिजे. मग, सुरू झाली ना तुमची तयारी? प्रत्येकाला स्वत: नीट माहिती द्या.

चला तर मग...लागू तयारीला.

पुढील अंकात, ट्रिप, AGM ह्याविषयी...

❖❖❖

*विश्वस्त, अन्नपूर्णा परिवार*

(E-mail : diwan.anju@gmail.com)




‘अन्नपूर्णा महिला को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.’ ला सर्वोत्कृष्ट वूमन - फ्रेंडली इन्स्टिट्यूट, २०२५ साठी सा-धन चा इला बेन पुरस्कार प्राप्त झाला.

१४ नोव्हेंबर २०२५ रोजी द अशोक हॉटेल, नवी दिल्ली येथे भव्य पुरस्कार सोहळा पार पडला.

**अन्नपूर्णा परिवार यांच्यावतीने हा पुरस्कार स्वीकारला :-**

निशा साळगावकर - बोर्ड मेंबर,

रोहिणी देशपांडे - बोर्ड मेंबर,

कल्पना जाधव - अकाउंट्स मॅनेजर,

सारिका मारणे - फायनान्स मॅनेजर,

सारिका कांबळे आणि अख्तरी शेख - वस्ती प्रतिनिधी.






OPPO F19 Pro+
Pune,Pune Division | 2025.08.16 11:12












































अन्नपूर्णा परिवारातर्फे प्रो. वृषाली मगदूम व प्राची धोपेश्वरकर बापट यांनी ‘संवाद त्रैमासिक’
न्यू एज प्रिंटींग प्रेस, ८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.